# महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद,पुणे

आयएसओ ९००१:२००८ मानांकित संस्था

## महाराष्ट्र राज्यातील कृषी विद्यापीठांमधील बी. एससी. (ऑनर्स) (कृषी व्यवसाय व्यवस्थापन) आणि बी. एस्सी. (ऑनर्स) (पशुसंवर्धन)

## हया अव्यावसायिक अभ्यासक्रमासाठीची प्रवेश माहिती पुस्तिका २०१८-१९


१३२/ब, भांबुर्डा, भोसले नगर, पुणे – ४११ ००७

ई-मेल : edn_mcaer@rediffmail.com

दूरध्वनी : (०२०) २५५३७६८८.

फॅक्स : (०२०) २५५३३७६४.

वेबसाईट : www.mcaer.org



दि. ०५ जुलै,२०१८ रोजी प्रकाशित.


(प्रवेश प्रक्रियेविषयक कायदेशीर बाबी उद्‌भवल्यास इंग्रजी माहिती पुस्तिका ग्राह्य धरण्यात येईल.)

# महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, पुणे व राज्यातील चारही कृषी विद्यापीठातील पदाधिकारी व शिक्षणाशी संबंधित अधिकारी

| पदाधिकारी | नाव | दूरध्वनी क्रमांक | फॅक्स क्रमांक |
|---|---|---|---|
| कुलपती व राज्यपाल, महाराष्ट्र राज्य | महामहिम सी. विद्यासागर राव | ०२२-२३६३२६६० | ०२२-२३६३३२७२ |
| कृषी मंत्री, महाराष्ट्र राज्य, प्रति-कुलपती व अध्यक्ष, महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, पुणे | मा. श्री. चंद्रकांत पाटील | ०२२-२२०२५०१४ | ०२२-२२०२४८७३ |
| महासंचालक | श्री. रविंद्र जगताप | ०२०-२५५३७२५७ | ०२०- २५५३३७६४ |
| संचालक (शिक्षण) | डॉ. हरिहर कौसडीकर | ०२०- २५५३७६८८ | ०२०- २५५३७६८८ |
| संचालक (विस्तार शिक्षण व साधनसामुग्री विकास) | डॉ. विठ्ठल शिर्के | ०२०- २५५३४५७७ | ०२०- २५५३३७६४ |
| संचालक (संशोधन) | डॉ. हरिहर कौसडीकर | ०२०- २५५३७६८८ | ०२०- २५५३७६८८ |
| सहसंचालक (प्रशासन) | श्री. गणेश घोरपडे | ०२०-२५५३१२०८ | ०२०-२५५३३७६४ |
| सहसंचालक (वित्त) | श्री. गणेश पाटील | ०२०- २५५३२७२६ | ०२०- २५५३३७६४ |
| **संकेतस्थळे: www.mcaer.org & maha-agriadmission.in, email: mcaer@rediffmail.com,edn_mcaer@rediffmail.com** | | | |

**महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी ४१३ ७२२ जि. अहमदनगर**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | कुलगुरु | डॉ. क. प. विश्वनाथा | ०२४२६-२४३२०८ | ०२४२६-२४३३०२ |
| २ | शिक्षण संचालक | डॉ. अ. ल. फरांदे | ०२४२६-२४३२२७ | ०२४२६-२४३२२७ |
| ३ | कुलसचिव | श्री. दि. ज्ञा. पवार | ०२४२६-२४३२१६ | ०२४२६-२४३२१६ |
| ४ | उपकुलसचिव (विद्या) | श्री. वि. आ. दाभाडे | ०२४२६-२४३२१५ | ०२४२६-२४३२१६ |
| **संकेतस्थळ: mpkv.mah.nic.in** | | | **email: dracdmpkv2013@rediffmail.com** | |

**डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला ४४४ १०४**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | कुलगुरु | डॉ. वि. म. भाले | ०७२४-२२५८३६५ | ०७२४-२२५८२१९ |
| २ | शिक्षण संचालक | डॉ. वि. म. भाले | ०७२४-२२५८०९३ | ०७२४-२२५८०९३ |
| ३ | कुलसचिव | डॉ. प्र. रा. कडू | ०७२४-२२५८३७२ | ०७२४-२२५८३७२ |
| ४ | उपकुलसचिव (विद्या) | डॉ. श्री. के. अहेरकर | ०७२४-२२५८३४८ | ०७२४-२२५८३४८ |
| **संकेतस्थळ: www.pdkv.ac.in** | | | **email :- dyracad@pdkv.ac.in** | |

**वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी ४३१ ४०२**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | कुलगुरु | डॉ. अ. श्री. ढवन | ०२४५२-२२३००२ | ०२४५२-२२३५८२ |
| २ | शिक्षण संचालक | डॉ. वि. द. पाटील | ०२४५२-२२२६८७ | ०२४५२-२२२६८७ |
| ३ | कुलसचिव | डॉ. ग. कों . लोंढे | ०२४५२-२२९७५५ | ०२४५२-२२९७५५ |
| ४ | उपकुलसचिव (विद्या) | डॉ. ना. गं. लाड | ०२४५२-२२७९०० | ०२४५२-२२७९०० |
| **संकेतस्थळ: mkv2.mah.nic.in** | | | **email: reg_mau@rediffmail.com** | |

**डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोली ४१५ ७१२**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | कुलगुरु | डॉ. तपस भट्टाचार्य | ०२३५८-२८२०६४ | ०२३५८-२८२०७४ |
| २ | शिक्षण संचालक | डॉ. स. सो. नारखेडे | ०२३५८-२८४३०८ | ०२३५८-२८४३०८ |
| ३ | कुलसचिव | डॉ. के. ज. चौधरी | ०२३५८-२८२०६५ | ०२३५८-२८३०६५ |
| ४ | उपकुलसचिव (विद्या) | श्री. अ. स. पवार | ०२३५८-२८२४११ विस्तार १२५ | ०२३५८-२८३९६३ |
| **संकेतस्थळ: www.dbskkv.org** | | | **email: regrdbskkv@rediffmail.com** | |

# महाराष्ट्र राज्यातील कृषी विद्यापीठांमधील बी. एससी. (ऑनर्स) (कृषी व्यवसाय व्यवस्थापन) आणि बी. एस्सी. (ऑनर्स) (पशुसंवर्धन) हया अव्यावसायिक अभ्यासक्रमाचे प्रवेश २०१८-१९

**१. प्रस्तावना :**

**१.१** महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, पुणे (कृषी परिषद) ही महाराष्ट्र कृषी विद्यापीठे, अधिनियम, १९८३ चे कलम १२ अंतर्गत स्थापन झालेली वैधानिक संस्था आहे. राज्यातील चारही कृषी विद्यापीठांतर्गत शिक्षण, संशोधन व विस्तार शिक्षण कार्यामध्ये प्रभावी समन्वय घडवून आणण्याचे कार्य कृषी परिषदेमार्फत करण्यात येते. कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण १५१७/प्र.क्र.६०/७अे, दि. ३०/५/२०१८ विचारात घेऊन चारही कृषी विद्यापीठांतर्गत पदविका अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेमध्ये कृषी परिषदेकडून समन्वयाचे काम करण्यात येत आहे.

**१.२** कृषी परिषदेच्या ९६ व्या बैठकीतील ठराव क्र. ०४/९६/२०१८ विचारात घेऊन राज्यातील चारही कृषी विद्यापीठांतील अव्यावसायिक पदवी अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येत आहे.

१.३ शासन निर्णय, कृषी व पदुम विभाग, क्र. मकृवि २०१०/प्र.क्र. १५५ / ७अे, दि.२०/१०/२०११ (**परिशिष्ट-'अे'**) अन्वये शासनाने, कृषी विद्यापीठांतर्गत पदवी, पदव्युत्तर व आचार्य पदवी अभ्यासक्रमामध्ये जागांचे आरक्षण, सामाजिक आरक्षणाच्या वाटपाची कार्यपध्दती व प्रवेश कार्यपध्दती निश्चित केली आहे.

१.४ कृषी परिषदेच्या दि.२२/०५/२०१३ रोजी संपन्न झालेल्या ८८ व्या बैठकीतील विषय क्र.१२ अन्वये कल्प टेक्नॉलॉजीज प्रा.लि. ('केटीपीएल'), पुणे यांच्यावर सामायिक प्रवेश प्रक्रिया **'ऑनलाईन पध्दती'**ने राबविण्याची जबाबदारी सोपविण्यात आली आहे.

## १.५ कृषी विद्यापीठांचे कार्यक्षेत्र

| अ. क्र. | कृषी विद्यापीठाचे नाव | कार्यक्षेत्रांतर्गत जिल्हे |
|---|---|---|
| १. | **म**हात्मा **फु**ले **कृ**षी **वि**द्यापीठ,<br>राहुरी-४१३ ७२२, जि. अहमदनगर<br>**(मफुकृवि - राहुरी)** | **अहमदनगर**, नाशिक, धुळे, नंदूरबार, जळगाव, पुणे, सोलापूर, सातारा, सांगली व कोल्हापूर |
| २ | **डॉ. पं**जाबराव **दे**शमुख **कृ**षी **वि**द्यापीठ,<br>अकोला-४४४ १०४.<br>**(डॉ.पंदेकृवि - अकोला)** | **अकोला,** अमरावती, यवतमाळ, वाशिम, बुलडाणा, वर्धा, नागपूर, भंडारा, गोंदिया, गडचिरोली व चंद्रपूर |
| ३ | **व**संतराव **ना**ईक **म**राठवाडा **कृ**षी **वि**द्यापीठ,<br>परभणी-४३१ ४०२.<br>**(वनामकृवि - परभणी)** | **परभणी,** हिंगोली, नांदेड, लातूर, उस्मानाबाद, बीड, जालना व औरंगाबाद. |
| ४ | **डॉ. बा**ळासाहेब **सा**वंत **कों**कण **कृ**षी **वि**द्यापीठ, दापोली-४१५ ७१२.<br>जि. रत्नागिरी<br>**(डॉ. बासाकोकृवि - दापोली)** | **रत्नागिरी,** सिंधुदुर्ग, रायगड, ठाणे, पालघर, मुंबई शहर व मुंबई उपनगर. |

## १.६ व्याख्या :

### १.६.१ विद्यापीठ कोटा ['U' Quota]

ज्या उमेदवारांकडे महाराष्ट्राचे अधिवास प्रमाणपत्र आहे. नसल्यास त्या उमेदवाराच्या महाविद्यालय / शाळा सोडल्याच्या दाखल्यावर महाराष्ट्र राज्यातील जन्म ठिकाण आहे किंवा महाराष्ट्र राज्यात जन्म झाल्याचा सक्षम प्रधिका-याकडील जन्म दाखला आहे, आणि संबंधित कृषी विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील संस्थेतून उच्च माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण आहे. अशा उमेदवारांसाठी राखून ठेवलेल्या जागांना **'विद्यापीठ कोटा' ['U' Quota]** असे संबोधण्यात यावे.

**१.६.२. महाराष्ट्र कोटा ['M' Quota]**

ज्या उमेदवारांकडे महाराष्ट्राचे अधिवास प्रमाणपत्र आहे. नसल्यास त्या उमेदवाराच्या महाविद्यालय / शाळा सोडल्याच्या दाखल्यावर महाराष्ट्र राज्यातील जन्म ठिकाण आहे किंवा महाराष्ट्र राज्यात जन्म झाल्याचा सक्षम प्रधिका-याकडील जन्म दाखला आहे. अशा उमेदवारांसाठी राखून ठेवलेल्या जागांना **'महाराष्ट्र कोटा' ['M' Quota]** असे संबोधण्यात यावे. यास्तव विद्यापीठ कोटयातील उमेदवार महाराष्ट्र कोटयाकरितासुध्दा पात्र आहेत.

**१.६.३ बाहेरील राज्यातील उमेदवार ['O.S.']**

**प्रवेश घेण्यापूर्वी लगतच्या १० वर्षे मुदतीमध्ये किमान तीन वर्षे ज्या उमेदवारांनी व ज्यांच्या आई- वडिलांनी महाराष्ट्रात निवास केला नसेल, अशा व्यक्ती** आणि ज्या व्यक्तींनी महाराष्ट्राव्यतिरिक्त देशातील इतर राज्यांचे अधिवास प्रमाणपत्र धारण केलेले असेल, अशा उमेदवारांना **'बाहेरील राज्यातील उमेदवार'** असे संबोधण्यात येईल. असे उमेदवार केवळ व्यवस्थापन कोटयातून प्रवेश घेण्यास पात्र असतील.

**१.६.४ जागेवर प्रवेश [Spot Admission]**

नियोजित ऑनलाईन प्रवेश फे-या संपल्यानंतर रिक्त झालेल्या / असलेल्या जागांवर प्रवेश मिळण्यासाठी 'संबंधित महाविद्यालया'त उमेदवाराने प्रत्यक्ष उपस्थित राहणे आणि उपस्थित उमेदवारांमधून आरक्षण व गुणवत्तेनुसार प्रवेश देण्याच्या प्रक्रियेस **'जागेवर प्रवेश' [Spot Admission]** असे संबोधण्यात यावे. **जागेवर प्रवेशासाठीच्या प्रक्रियेच्यावेळी अनुपस्थित असलेला उमेदवार 'जागेवर प्रवेशा'साठी पात्र ठरणार नाही.**

**१.६.५** "प्रवेश अर्ज" याचा अर्थ, उमेदवाराने प्रवेशाकरिता ऑनलाईन पध्दतीने भरावयाचा विहित नमुना, असा आहे;

**१.६.६** "अर्हता परीक्षा" याचा अर्थ, ज्या परीक्षेच्या आधारे एखादा उमेदवार प्रवेशाकरिता पात्र होतो अशी परीक्षा किंवा तिला समतुल्य असलेली परीक्षा, असा आहे;

१.६.७ “ऑनलाईन प्रवेश वाटप फेरी” याचा अर्थ, उमेदवाराची गुणवत्ता, प्रवर्ग, पसंतीक्रम (विकल्प) विचारात घेऊन संगणकप्रणालीद्वारे प्रवेशाचे वाटप करण्याची कॅपअंतर्गत प्रक्रिया, असा आहे.

## २. संस्था व पदवी अभ्यासक्रमांचा तपशील :

पदवी अभ्यासक्रम पूर्णवेळ अभ्यासक्रम असून अभ्यासक्रमाचे व परीक्षेचे माध्यम इंग्रजी राहील.

## २.१ पदवी अभ्यासक्रम व पात्रता :

१. किमान वयः- प्रवेश अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या तारखेपर्यंत उमेदवाराचे वय किमान १६ वर्षे असावे.
२. एकूण गुणः- पात्रता परीक्षेमध्ये (इ. १२ वी ) खुल्या उमेदवारास ५० टक्क्यांपेक्षा कमी आणि आरक्षित प्रवर्गाच्या (अ.जा. / अ.ज. / वि.जा. / भ.ज. (ब) / भ.ज. (क) / भ.ज. (ड) / इमाव / विमाव ) उमेदवारास ४० टक्क्यांपेक्षा कमी गुण नसावे.

| पदवी अभ्यासक्रम | कालावधी | श्रेयांक भार | प्रवेश पात्रता |
|---|---|---|---|
| बी. एससी. (ऑनर्स) (कृषी व्यवसाय व्यवस्थापन) | ४ वर्षे (८ सत्रे) | १७९ | (१) महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या १०+२ पध्दतीनुसार इयत्ता १२ वी (विज्ञान) उत्तीर्ण किंवा तत्सम परीक्षा, भौ.र.जी. किंवा भौ.र.ग.जी. किंवा भौ.र.ग. आणि इंग्रजीसह उतीर्ण.<br>(२) गणित हा विषय घेतला नसल्यास, अशा उमेदवारास अपूर्तता भरून काढण्यासाठी संबंधित विद्यापीठाने विहित केलेले अभ्यासकम पूर्ण करावे लागतील.<br>(३) सक्षम प्राधिकाऱ्याकडून आयोजित करण्यात आलेली सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षातील भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, जीवशास्त्र (PCB) **किंवा** भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, गणित (PCM) या विषयातील MHT-CET / JEE / NEET / AIEEA-UG सामायिक प्रवेश परीक्षा. |

| पदवी अभ्यासक्रम | कालावधी | श्रेयांक भार | प्रवेश पात्रता |
|---|---|---|---|
| बी. एस्सी. (ऑनर्स) (पशुसंवर्धन) | ४ वर्षे (८ सत्रे) | १७९ | (१) महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या १०+२ पध्दतीनुसार इयत्ता १२ वी (विज्ञान) उत्तीर्ण किंवा तत्सम परीक्षा, भौ.र.जी. किंवा भौ.र.ग.जी. किंवा इंटर (कृषी) आणि इंग्रजीसह उतीर्ण.<br>(२) गणित हा विषय घेतला नसल्यास, अशा उमेदवारास अपूर्तता भरून काढण्यासाठी संबंधित विद्यापीठाने विहित केलेले अभ्यासकम पूर्ण करावे लागतील.<br>(३) सक्षम प्राधिकाऱ्याकडून आयोजित करण्यात आलेली सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षातील भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, जीवशास्त्र (PCB) या विषयातील MHT-CET / NEET / AIEEA-UG सामायिक प्रवेश परीक्षा. |

**(भौ.- भौतिकशास्त्र    र.- रसायनशास्त्र    ग.- गणित    जी.- जीवशास्त्र)**

**टीपः-**

(१) ज्या उमेदवारांनी इ. १२ वी (विज्ञान) च्या परीक्षेमध्ये गणित हा विषय घेतला नसेल, त्यांना दोन अतिरिक्त क्रेडीट्स पूर्ण करावे लागतील. अंतिम निकालाचा CGPA परिगणित करताना त्यातील गुणसंख्या विचारात घेतली जाणार नाही

(२) महाराष्ट्राबाहेरील इ. १२ वी (विज्ञान) ची अर्हता परीक्षा उत्तीर्ण झालेल्या किंवा तत्सम परीक्षेमध्ये जीवशास्त्र ऐवजी वनस्पतीशास्त्र आणि प्राणीशास्त्र हे विषय घेतलेले उमेदवार पात्र समजण्यात येतील.

(३) डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला यांच्या कार्यक्षेत्रातील ग्रामीण शिक्षण संस्था अमरावती किंवा वर्धा यांच्याकडून भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, जीवशास्त्र या अनिवार्य विषयांसह कृषी विज्ञान पदविका प्राप्त केलेले उमेदवार हे राज्यातील सर्व कृषी विद्यापीठातील बी. एस्सी. (ऑनर्स) (पशुसंवर्धन), बी. एसएसी. (ऑनर्स) (कृषी व्यवसाय व्यवस्थापन) या अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी पात्र राहतील.

(४) शासनाकडून वेळोवेळी सुधारित केलेल्या निर्णयानुसार प्रवेश पात्रतेमध्ये बदल करण्यात येतील.

## २.२ पदवी अभ्यासक्रमाची विना अनुदानित (कायमस्वरूपी) महाविद्यालयनिहाय प्रवेश क्षमता व इतर तपशील.

| अ. क्र. | पदवी अभ्यासक्रम | महाविद्यालयाचे नाव व पत्ता | महाविद्यालय सांकेतांक क्रमांक | वर्गवारी | विद्यापीठाचे नाव | प्रवेश क्षमता | संपर्क अधिकाऱ्याचे नाव | दूरध्वनी / फॅक्स | वसतीगृह सुविधा | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | पुरुष | स्त्री |
| १. | बी. एससी. (ऑनर्स) (कृषी व्यवसाय व्यवस्थापन) | १. डॉ.डी.वाय.पाटील कृषी व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालय, आकुर्डी, पुणे ४११ ०४४. | १८१९७ | क (२०१६-१७) | मफुकृवि | ८० | डॉ. एस. एन. टिळेकर | ०२०-२०२७५१५५, ९४२२५३९५३५ फॅक्स-२७६५५०५९ | आहे (मर्यादित) | आहे (मर्यादित) |
| | | २. कृषी व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालय, नारायणगांव ता. जुन्नर जि.पुणे ४१० ५०४. | १८१९८ | ब (२०१६-१७) | मफुकृवि | ८० | डॉ. एम. बी. भुजबळ | ०२१३२-२९७०१४ ९७६६६९२५१४ | आहे (मर्यादित) | आहे (मर्यादित) |
| | | ३. राजश्री छत्रपती शाहू महाराज कृषी व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालय, विलिंगडन कॉलेज कंपाऊंड, सांगली ४१६ ४१५. | १८२०९ | ड (२०१५-१६) | मफुकृवि | ४० | डॉ. बी. ए. चौगुले | ०२३३-२६०११४७ ९२२५३४०९८५ फॅक्स-३०२५२५६ | आहे (मर्यादित) | आहे (मर्यादित) |
| | | ४. कृषी व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालय, चंदनापुरी घाट, गुंजाळवाडी, ता. संगमनेर, जि. अहमदनगर | १८२६४ | क (२०१४-१५) | मफुकृवि | ४० | श्री. बी. ई. रंधे | ०२४२५-२०६३०९ ९९२१५२१५७८ | आहे (मर्यादित) | आहे (मर्यादित) |
| | | ५. कृषी व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालय, लोणी, ता. राहाता, जि.अहमदनगर | १८२७५ | ब (२०१६-१७) | मफुकृवि | ४० | डॉ. एस. एस. गोंदकर | ०२४२२-२७२०१४, ८९७५८२५२५२ | आहे (मर्यादित) | आहे (मर्यादित) |

| अ. क्र. | पदवी अभ्यासक्रम | महाविद्यालयाचे नाव व पत्ता | महाविद्यालय सांकेतांक क्रमांक | वर्गवारी | विद्यापीठाचे नाव | प्रवेश क्षमता | संपर्क अधिकाऱ्याचे नाव | दूरध्वनी / फॅक्स | वसतीगृह सुविधा | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | पुरुष | स्त्री |
| | | ६. कृषी व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालय, सरस्वतीनगर, मुंबई-आग्रा रोड, पंचवटी, नाशिक ४२२ ००३. | १८२७६ | क | मफुकृवि | ४० | डॉ. पी. पी. जगताप | ०२५३-२३०३३११ ९९७५७६५७०१ | आहे (मर्यादित) | आहे (मर्यादित) |
| | | ७. कृषी व्यवसाय व्यवस्थापन, मु. पो. वडाळा ता. उत्तर सोलापूर जि.सोलापूर-४१६२२२ | १८२७७ | २०१४-१५ पासून सुरु | मफुकृवि | ४० | प्रा. एस. एस. टिंगारे | ०२१७-२७३५५२१ ९४२०२९५९०७ | आहे (मर्यादित) | आहे (मर्यादित) |
| | | ८. कृषी व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालय, मु.पो. शारदानगर, ता. बारामती जि. पुणे-४११०१५ | १८२७८ | २०१४-१५ पासून सुरु | मफुकृवि | ४० | प्रा. जया तिवारी | ०२११२-२५५५१८ ९०२१९२९२२९ | आहे (मर्यादित) | आहे (मर्यादित) |
| | | ९. श्रीराम व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालय, मु.पो. पानीव ता.माळशिरस जि.सोलापूर ४१३ ११३ | १८२८० | २०१५-१६ पासून सुरु | मफुकृवि | ४० | डॉ. एस. टी. गोरे | ०२१८५-२७४१३३ ९७६६६६९१३७ फॅक्स-२७४२४४ | आहे (मर्यादित) | आहे (मर्यादित) |
| | | १०. विवेकानंद कृषी व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालय, विवेकानंद नगर, (हिवरा आश्रम) ता. मेहकर जि.बुलडाणा ४४३३०१. | १८१९९ | ड २०१६-१७ | डॉ.पंदेकृवि | ४० | श्री. एन. एस. बदारके | ०७२६८-२६४४७० ९९२१३२९८०१ | आहे (मर्यादित) | आहे (मर्यादित) |
| | | ११. राजर्षी शाहु महाराज कृषी व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालय, मु.पो.सडक अर्जुनी, जि.गोदिया | १८२२९ | २०१५-१६ पासून सुरु | डॉ.पंदेकृवि | ४० | श्री. अमोल धांडे | ०७१९९-२३००८ ७५०७७७५१२६ | नाही | नाही |

| अ. क्र. | पदवी अभ्यासक्रम | महाविद्यालयाचे नाव व पत्ता | महाविद्यालय सांकेतांक क्रमांक | वर्गवारी | विद्यापीठाचे नाव | प्रवेश क्षमता | संपर्क अधिकाऱ्याचे नाव | दूरध्वनी / फॅक्स | वसतीगृह सुविधा | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | पुरुष | स्त्री |
| | | १२. कृषी व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालय, प्लॉट क्र.पी-७, ॲडीशनल एमआयडीसी, हरंगुळ रेल्वे स्टेशन, बार्शी रोड, लातूर ४१३५१२ | १८२०० | क (२०१५-१६) | वनामकृवि | ८० | डॉ. एस. पी. मोरे | ०२३८२-२६७३४२ ९१५८१३८००३ ९४२२०७१४३८ | आहे (मर्यादित) | आहे (मर्यादित) |
| | | **एकूण** | | | | **६००** | | | | |
| **२.** | **बी. एस्सी. (ऑनर्स) (पशुसंवर्धन)** | पशुसंवर्धन महाविद्यालय, माळेगाव कॉलनी, शारदानगर, बारामती जि.पुणे | २०१११ | उपलब्ध नाही | मफुकृवि | ३० | श्री. ए. बी. रासकर | ०२११२-२५५५१८ ९९२१५८७१४३ | आहे (मर्यादित) | आहे (मर्यादित) |
| | | **एकूण बेरीज** | | | | **६३०** | | | | |

टीपः- (१) गुणवत्ता, आरक्षण आणि संबंधित विद्यापीठ / महाविद्यालय यांनी ठरविलेल्या प्रमाणकानुसार वसतीगृह सुविधा पुरविली जाईल.

(२) बारामती, जि. पुणे येथील बी.एससी. (ऑनर्स) (पशुसंवर्धन) व बी. एससी. (ऑनर्स) (कृषी व्यवसाय व्यवस्थापन) २+२ या पदवी अभ्यासक्रमातील प्रथम व द्वितीय वर्षामध्ये विद्यार्थी बारामती येथे अभ्यासक्रम पूर्ण करतील. तर तृतीय व चतुर्थ वर्षात व्हॅन हॉल लॅरेस्टीन युनिव्हसिर्टी, नेदरलॅंड येथे अभ्यासक्रम पूर्ण करतील. तथापि, बी.एससी. (ऑनर्स) (पशुसंवर्धन) हया पदवी अभ्यासक्रमातील तृतीय व चतुर्थ वर्षात व्हॅन हॉल लॅरेस्टीन युनिव्हसिर्टी, नेदरलॅंड येथे अभ्यासक्रम पूर्ण करणे विद्यार्थ्यांना ऐच्छिक असेल.

(३) महाविद्यालयांची प्रवेश क्षमता कमी किंवा अधिक करण्याचे अधिकार कृषी परिषद राखून ठेवत आहे.

(४) उक्त महाविद्यालयांपैकी कोणत्याही महाविद्यालयामध्ये कोणत्याहीवेळी प्रवेश प्रक्रिया स्थगित करण्याचे अधिकार कृषी परिषद राखून ठेवत आहे.

## ३. उमेदवारांसाठी सूचना :

३.१ **प्रवेशासाठी विहीत नमुन्यातील अर्ज भरण्यापूर्वी उमेदवारांनी माहितीपत्रक आणि प्रवेश अर्ज यांचे काळजीपूर्वक वाचन करावे.**

३.२ (i) प्रत्येक अर्जदाराने **फक्त एकच प्रवेश अर्ज** 'केटीपीएल'च्या **'maha-agriadmission.in'** या संकेतस्थळावर **'ऑन लाईन'** पध्दतीने भरावा. **उमेदवाराने एकापेक्षा जास्त प्रवेश अर्ज संकेतस्थळावर दाखल केल्यास, शेवटचा दाखल केलेला प्रवेश अर्ज ग्राह्य धरण्यात येईल.**

(ii) **प्रवेश अर्जाची प्रत** किंवा **इतर कोणतीही कागदपत्रे टपालाने / कुरीअरने किंवा हातबटवडयाने कृषी परिषद, कृषी विद्यापीठ किंवा मे. केटीपीएल, पुणे यापैकी कोठेही पाठवू नयेत.**

(iii) **संकेतस्थळावर प्रवेश अर्ज भरल्यानंतर स्वाक्षरी, उमेदवाराचे पासपोर्ट आकाराचे सध्याचे छायाचित्र आणि आवश्यक त्या सर्व कागदपत्रांच्या मूळप्रती स्कॅन करून संकेतस्थळावर अपलोड कराव्यात.** मे. केटीपीएल, पुणे यांच्या अधिृकत केंद्रांवर एक कागदपत्र स्कॅन केल्यास त्यासाठी रू.५/- शुल्क आकारण्यात येईल. अशा अधिकृत केंद्रांची यादी **'maha-agriadmission.in'** या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

(iv) **खुल्या उमेदवारांसाठी तसेच महाराष्ट्राबाहेरील सर्व उमेदवारांसाठी रु.१०००/- तर महाराष्ट्रातील आरक्षित प्रवर्गातील उमेदवारांसाठी रु.५००/- प्रवेश अर्ज शुल्क आहे. सदरचे शुल्क नेट बँकींग, आरटीजीएस, एनईएफटी, डेबिट कार्ड किंवा क्रेडीट कार्ड द्वारे भरावे. प्रवेश अर्ज भरल्यानंतर असे शुल्क भरण्याची व्यवस्था संकेतस्थळावर केलेली आहे. सदरचे शुल्क ना परतावा आहे.**

(v) अंतिम गुणवत्ता यादीतील, संबंधित अभ्यासक्रमास पात्र असलेले उमेदवारच व्यवस्थापन कोटयातील प्रवेशाकरिता पात्र आहेत. म्हणून 'व्यवस्थापन कोटया'तून प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या उमेदवारांनीसुध्दा maha-agriadmission.in या संकेतस्थळाद्वारे ऑनलाईन प्रवेश अर्ज भरावा व संबंधित कागदपत्रे संकेतस्थळावर अपलोड करावेत आणि अंतिम गुणवत्ता यादी प्रसिध्द झाल्यानंतर संबंधित महाविद्यालयाकडे अर्ज करावेत. संस्थाचालक / प्राचार्य हे अशा उमेदवारांना गुणवत्तेनुसार व्यवस्थापन कोटयातून प्रवेश देतील.

३.३ **उमेदवाराने अर्जासोबत खाली दर्शविलेल्या मूळ कागदपत्रांच्या मूळ प्रती स्कॅन करून पुढील क्रमाने त्याच्या लॉग-इनद्वारे संकेतस्थळावर अपलोड कराव्यात.**

(अे) **पात्रता परीक्षेचे गुणपत्रक / श्रेणी पत्रक.**

(बी) (i) ज्या शाळा / महाविद्यालयात शेवटची परीक्षा उत्तीर्ण झाला आहे, ती **शाळा / महाविद्यालय सोडल्याचा दाखला किंवा इतर काही अभ्यासक्रमामध्ये उमेदवार प्रवेशित असल्यास त्या महाविद्यालयाचे बोनाफाईड प्रमाणपत्र.**

(ii) मागील शैक्षणिक वर्षात राज्यातील कृषी विद्यापीठांतर्गत पदवी शिक्षण घेत असलेल्या उमेदवाराने प्रथम वर्ष पदवी अभ्यासक्रमासाठी पुनश्च अर्ज केल्यास, **चालू शैक्षणिक वर्षासाठी पहिल्या वर्षात प्रवेश घेण्याकरिता चालू शैक्षणिक वर्षापूर्वी प्रवेश घेतलेल्या संबंधित महाविद्यालयाचे 'बोनाफाईड प्रमाणपत्र'.**

(iv) महाराष्ट्र राज्याबाहेरील (OS) उमेदवारांना महाविद्यालय सोडल्याचा दाखला सादर करता येत नसेल, तर अशा वेळेस त्या महाविद्यालयाचे **'स्थलांतर प्रमाणपत्र'.**

(v) अशा उमेदवारास प्रवेश दिल्यास त्यास/तीस शाळा सोडल्याचा दाखला **तीन महिन्यांच्या** आंत सादर करणे आवश्यक आहे. सदर **दाखला विहित मुदतीत सादर न केल्यास त्याचा/तिचा प्रवेश आपोआपच रद्द समजण्यात येईल.**

(vi) १७ नंबर अर्ज भरून उमेदवार इ. १२ वी उत्तीर्ण झालेला असल्यास "शेवटच्या वर्गाचा महाविद्यालय / शाळा सोडल्याचा दाखला."

(सी) (i) महाराष्ट्र राज्यातील सक्षम प्राधिका-याने दिलेले अधिवास प्रमाणपत्र किंवा जन्म ठिकाणाचा उल्लेख असलेले, महाविद्यालय / शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र किंवा सक्षम प्रधिका-याकडील जन्म दाखला.

(ii) बाहेरील राज्यातील उमेदवारांना सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले अधिवास प्रमाणपत्र / रहिवाशी दाखला / रहिवास व जन्मदाखला.

(डी) (i) **तलाठी / पटवारी यांनी सन २०१६-१७ किंवा २०१७-१८ मध्ये दिलेला शेतजमिनीचा ७/१२ चा उतारा / खसरा (गांव नमुना)** उमेदवाराच्या नावावर किंवा त्यांचे आई / वडील किंवा त्याचे आजी / आजोबा यांच्या नावे असावा.

(ii) यदाकदाचित आई / वडील हयात नसतील, तर सदर उतारा त्याच्या कुटुंब प्रमुख्याच्या नावावर असावा व या परिस्थितीत कुटुंब प्रमुखाचे **रु.१००/- च्या**

**मुद्रांकावर प्रतिज्ञापत्र असावे. प्रतिज्ञापत्रामध्ये सदर उमेदवाराचा उक्त जमिनीमध्ये कायदेशीर हक्क असल्याचे नमूद करण्यात यावे.**

(iii) सदर उतारा मराठी / हिंदी / इंग्रजी भाषेत नसेल तर **उताऱ्याचे अचूक भाषांतर अपलोड करावे.**

(iv) उमेदवाराच्या आईचा तिच्या वडीलांकडील शेतजमिनीत वाटा असल्याबाबतचे रु.१००/- च्या मुद्रांकावर तिच्या वडिलांचे प्रतिज्ञापत्र व ७/१२ उतारा अपलोड केल्यास, असा उमेदवार १२ गुणांचा अधिभार मिळण्यास पात्र राहील.

(v) **उमेदवारास सूचित करण्यात येते की, ७/१२ खसरा/उता-याच्या आवश्यक तेवढया छायाप्रती प्रवेशाच्या वेळेस सोबत ठेवाव्यात.**

(vi) उमेदवाराच्या शेतजमिनीच्या ७/१२ खसरा / उतारा-यामध्ये नोंदविलेल्या नावापेक्षा त्याच्या/तिच्या इयत्ता १२ वी च्या गुणपत्रक व प्रमाणपत्रामध्ये असलेले नाव भिन्न असल्यास, अशा उमेदवाराने त्याबाबतचे प्रतिज्ञापत्र सादर करणे बंधनकारक राहील.

(इ) उमेदवाराचे आई / वडील भूमिहीन शेतमजूर असल्यास, **तहसीलदार अथवा नायब तहसीलदार यांचे, सदर पालक भूमिहीन शेतमजूर असून त्यांचे उपजीविकेचे शेत मजुरी हेच साधन असल्याचे प्रमाणपत्र असावे.** सदर प्रमाणपत्र उमेदवाराच्या नावे असू नये. अशा प्रमाणपत्रधारकास 'शेतकरी' प्रवर्ग लागू होणार नाही. विहित नमुना **परिशिष्ट 'बी'** मध्ये सोबत जोडला आहे.

(एफ्) (i) **सन २०१६-१७ किंवा २०१७-१८ या वर्षातील तहसीलदार किंवा नायब तहसीलदार यांनी दिलेले शेतकरी असल्याबाबतचे प्रमाणपत्र**. या प्रमाणपत्राचा नमुना **परिशिष्ट 'सी'** येथे जोडला आहे. उमेदवार किंवा त्याचे / तिचे आई-वडील अथवा आजी/आजोबा (वडिलांचे आई-वडील) हे शेतजमीनधारक किंवा कूळ असून त्या जमिनीवरील शेतीव्दारे मिळणारे उत्पन्न हेच त्या कुटुंबाच्या उपजीविकेचे प्रमुख साधन आहे, असे या प्रमाणपत्रामध्ये नमूद करणे आवश्यक आहे **किंवा तहसीलदार / नायब तहसीलदार यांनी दिलेले त्यांच्याकडील उपलब्ध असलेल्या विहित नमुन्यातील प्रमाणपत्र.**

(ii) **उमेदवार मच्छीमार व्यवसाय करणाऱ्या कुटुंबातील असल्यास,** संबंधित तालुक्यातील **तहसीलदार किंवा नायब तहसीलदार किंवा बंदर अधिकारी** यांनी

दिलेले अशा आशयाचे प्रमाणपत्र. या प्रमाणपत्रात उमेदवाराच्या आई/वडिलांचे उपजीविकेचे मुख्य साधन मच्छीमारी हेच आहे असे नमूद केलेले असावे.

(जी) राज्यातील **सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले जातीचे विहित नमुन्यातील प्रमाणपत्र.**

(एच) मा. सर्वोच्च न्यायालयाने सिव्हील अपील क्र. ११२३४-४८/२०१७ संदर्भात दिलेल्या आदेशास अनुसरून अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती (क), भटक्या जमाती (ड), इतर मागासवर्ग आणि विशेष मागासप्रवर्ग या उमेदवारांचे जात वैधता प्रमाणपत्र. जात वैधता प्रमाणपत्र नसल्यास, सदर प्रमाणपत्र मिळण्याकरिता अर्ज सादर केलेला असल्याची संबंधित कार्यालयाची पावती.

(आय्) **विमुक्त जाती-अ, भटक्या जमाती-ब, क, ड , इतर मागासवर्गीय जाती व विशेष मागास प्रवर्गातील उमेदवारांनी** सक्षम अधिकाऱ्याचे **दिनांक १ एप्रिल,२०१८ रोजी किंवा त्यानंतर दिलेले किंवा अर्ज ज्या दिनांकास दिला असेल, त्या दिनांकास ग्राह्य असलेले 'उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे (Non Creamy Layer)' प्रमाणपत्र.** उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे प्रमाणपत्र नसल्यास, सदर प्रमाणपत्र मिळण्याकरिता अर्ज सादर केलेला असल्याची संबंधित कार्यालयाची पावती.

(वरील मुद्दा क्र. एच व आय बाबत उमेदवारांना विशेष सूचनाः- 'जात वैधता प्रमाणपत्र' / 'उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबत'चे प्रमाणपत्र मिळण्याकरिता, अर्ज सादर केलेल्या उमेदवारांना त्यांच्या प्रवर्गातून ऑनलाईन प्रवेश फेरीद्वारे मिळणारा प्रवेश तात्पुरत्या स्वरूपाचा असेल. या उमेदवारांनी ज्या महाविद्यालयात प्रवेशाचे वाटप झालेले आहे, अशा महाविद्यालयाकडे दि. १४ ऑगस्ट,२०१८ पर्यंत जात वैधता प्रमाणपत्र / उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे. अन्यथा अशा उमेदवारांचे प्रवेशाचे वाटप आपोआप रद्द समजून त्यांना खुल्या प्रवर्गात ग्राह्य धरण्यात येईल. यामुळे रिक्त होणारी जागा 'जागेवरील प्रवेश फेरी'द्वारे भरण्यात येईल.)

(जे) महाराष्ट्र राज्यातील जिल्हा पुनर्वसन अधिकारी किंवा शासनाने प्राधिकृत केलेला अधिकारी (प्राधिकृत केले असल्यास प्राधिकृत करण्यात आले असल्याच्या सक्षम अधिकाऱ्याच्या पत्रासह) यांनी, उमेदवार / वडील हे प्रकल्पग्रस्त आहेत व त्याच्या/तिच्या वडिलांची / पालकांची किंवा आजोबांची **शेतजमीन महाराष्ट्रातील** कृषी विद्यापीठे/ पाटबंधारे/ वीज /संरक्षण **प्रकल्पासाठी संपादित केलेली / झालेली आहे, असे प्रमाणपत्र.** सक्षम अधिकाऱ्याने दिलेल्या **प्रकल्पग्रस्ताच्या प्रमाणपत्रावर या सवलतीचा फायदा ज्याला द्यावयाचा आहे, त्याच्या नावाचा उल्लेख असणे आवश्यक आहे.**

(के) प्राधिकृत समादेशकाने दिलेले **राष्ट्रीय छात्र सेना 'बी'** किंवा **'सी'** हवाई दल/ नौदल / स्थलसेना विभागाचे **प्रमाणपत्र.**

(एल्) (i) **इ.११ / १२ वी मध्ये जिल्हा, राज्य, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय क्रीडा/ खेळ /** वादविवाद/ निबंध स्पर्धा/वक्तृत्व **स्पर्धांमध्ये प्रतिनिधीत्व** करणाऱ्या उमेदवारांनी सादर केलेले **जिल्हा क्रीडा अधिकारी यांचे प्रमाणपत्र**.

(ii) **नवोदय विद्यालयातील विद्यार्थ्यांबाबत भारतीय क्रीडा महासंघाच्या (SGFI)** वतीने दिलेले आणि **जिल्हा क्रीडा अधिकारी व जिल्हाधिकारी यांच्या संयुक्त स्वाक्षरीचे प्रमाणपत्र.**

**टिप-** इ. १२ वी मध्ये खेळाचे गुण गुणपत्रकामध्ये समाविष्ट असल्यास व अशा खेळाचे स्वतंत्र प्रमाणपत्र उमेदवाराने अपलोड केल्यास अशावेळी दुहेरी लाभ टाळण्यासाठी स्वतंत्र प्रमाणपत्र ग्राह्य धरण्यात येणार नाही.

**(iii) क्रीडा संघटनेमार्फत दिलेले प्रमाणपत्र ग्राह्य धरण्यात येणार नाही.**

(एम्) अर्जदाराच्या आई / वडिलांचे **स्वातंत्र्य सैनिक असल्याबाबतचे मा. पंतप्रधान / मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या स्वाक्षरीचे प्रमाणपत्र**. स्वातंत्र्य सैनिकाचा मुलगा / मुलगी किंवा त्यांचा मुलगा / मुलगी यांना या प्रमाणपत्राचा फायदा मिळेल; परंतु अशा परिस्थितीत **स्वातंत्र्य सैनिकाचे आणि जर स्वातंत्र्य सैनिक हयात नसल्यास स्वातंत्र्य सैनिकाच्या पती/पत्नीचे रु.१००/- च्या मुद्रांकावर खालील मुद्यांचा समावेश असलेले प्रतिज्ञापत्र.**

(१) उमेदवार हा स्वातंत्र्यसैनिकाच्या मुलाचा / मुलीचा मुलगा/ मुलगी आहे.

(२) **स्वातंत्र्यसैनिकाने या सवलतीचा उपयोग यापूर्वी कोणत्याही नातेवाईकासाठी केलेला नाही** आणि आता उपयोग केल्यानंतर तो पुढे करणार नाही.

वरील मुद्यांसंबंधात काही शंका, तक्रारी, अडचणी असल्यास त्याचे निराकरण करण्यासाठी प्रचलित शासन निर्णयाचा संदर्भ घ्यावा.

(एन्) **सक्षम प्राधिका-याने दिलेले राष्ट्रीय सेवा योजनेचे प्रमाणपत्र.**

(ओ) **उमेदवाराचे वडील, सैनिक असल्यास** तशा आशयाचे **जिल्हा सैनिक बोर्ड किंवा संबंधित तुकडीचा प्रमुख सेनाधिकारी यांचे विहीत नमुन्यातील प्रमाणपत्र** अथवा **डिस्चार्ज प्रमाणपत्र.**

(पी) **सेवेत असणा-या उमेदवारांसाठी संबंधित नियुक्ती अधिकाऱ्याचे 'ना हरकत प्रमाणपत्र'.**

(क्यु) **उमेदवाराचे आई / वडील, कृषी परिषद / कृषी विद्यापीठाचे** आजी/ माजी अथवा मृत सेवक असल्यास, **संबंधित कार्यालय प्रमुख किंवा नियंत्रण अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र.**

(आर) शारीरिकदृष्टया अपंगत्व प्रवर्गातून प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या उमेदवाराने **प्राधिकृत अधिका-याचे** (जिल्हा शल्य चिकित्सक किंवा समतुल्य शासकीय रूग्णालय / वैद्यकीय मंडळ) **<u>अपंगत्वाबद्दलचे प्रमाणपत्र</u>**.

(एस) अनाथ प्रवर्गातून प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या उमेदवाराने, आयुक्त, महिला व बालविकास, पुणे यांच्या छापील लेटर हेडवरील उपायुक्त (बालविकास), पुणे / आयुक्त, महिला व बालविकास, पुणे यांच्या स्वाक्षरीचे 'अनाथ प्रमाणपत्र'.

३.४ **सर्व दृष्टीने परिपूर्ण भरलेला तसेच प्रवेश वेळापत्रकात दिलेल्या शेवटच्या तारखेस किंवा त्यापूर्वी संकेतस्थळावर अपलोड केलेला प्रवेश अर्जच प्रवेशासाठी ग्राह्य धरला जाईल.**

३.५ (i) **व्यवस्थापन कोट्यातून** प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या **अनिवासी भारतीय (NRI)** उमेदवारानी संकेतस्थळावर ऑनलाईन प्रवेश अर्ज भरणे आवश्यक आहे

(ii) अशा उमेदवाराला संबंधित संस्था / महाविद्यालय तात्पुरत्या स्वरुपात प्रवेश देईल.

(iii) अशा उमेदवाराची प्रवेशासाठीची पात्रता संबंधित विद्यापीठस्तरावरुन तपासून प्रवेश निश्चित केला जाईल.

३.६ **स्कॅन करून अपलोड केलेली कागदपत्रे वाचनीय असावीत. याची खातरजमा करूनच कागदपत्रे अपलोड करावीत. अपलोड केलेली कागदपत्रे वाचनीय नसल्यास ते ग्राह्य धरण्यात येणार नाहीत व त्याची जबाबदारी पूर्णतः उमेदवाराची असेल.**

उक्त अपलोड केलेल्या मूळ प्रतींच्या सत्यतेबाबत परिशिष्ट 'डी' येथील नमुन्यात स्वघोषणापत्र संकेतस्थळावर अपलोड करावे.

३.७ **खालीलपैकी कोणत्याही एका त्रुटीमुळे प्रवेश अर्जाचा विचार न करता तो आपोआपच रद्द समजण्यात येईल.**

**(क) किमान वय किंवा किमान एकूण गुणांचे निकष पूर्ण करीत नसल्यास.**

**(ख) सक्षम प्राधिका-याने दिलेले अधिवास प्रमाणपत्र किंवा जन्म ठिकाणाचा उल्लेख असलेले महाविद्यालय / शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र किंवा सक्षम प्रधिका-याकडील जन्म दाखल्याची प्रत संकेतस्थळावर अपलोड केली नसल्यास.**

(ग) **उमेदवाराचे पासपोर्ट आकाराचे सध्याचे छायाचित्र व स्वतःची स्वाक्षरी** संकेतस्थळावर अपलोड केली नसल्यास.

(घ) **पात्रता परीक्षेचे गुणपत्रक / श्रेणीपत्रकाच्या मूळ प्रती संकेतस्थळावर अपलोड केल्या नसल्यास.**

(च) **शाळा / महाविद्यालय सोडल्याच्या दाखल्याची मूळ प्रत संकेतस्थळावर अपलोड केली नसल्यास,** (उमेदवाराने या प्रवेशापूर्वी दुसऱ्या अभ्यासक्रमास प्रवेश घेतला असेल तर त्या महाविद्यालयाने दिलेल्या बोनाफाईड प्रमाणपत्राच्या आधारे प्रवेश दिला जाईल; परंतु, मूळ महाविद्यालय सोडल्याचा दाखला प्रवेश घेतल्यापासून ३ महिन्यांच्या आत सादर करणे बंधनकारक राहील.)

(छ) सेवेत असणा-या उमेदवाराने संबंधित **नियुक्ती प्राधिकाऱ्याचे 'ना हरकत प्रमाणपत्र' संकेतस्थळावर अपलोड केले नसल्यास.**

**(ज) प्रवेश अर्जाचे विहित शुल्क न भरल्यास.**

**(झ) संकेतस्थळावर अपलोड केलेल्या मूळ प्रतींच्या सत्यतेबाबत स्वयंघोषणापत्र संकेतस्थळावर अपलोड केले नसल्यास.**

३.८ **गुणांच्या बाबतीत बरोबरी झाल्यास उमेदवारांचा गुणवत्ताक्रम (Merit Position) ठरविण्यासाठी अनुक्रमे खालील मार्गदर्शक तत्वांचा अवलंब करण्यात येईल.**

(अ) उच्च माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षेतील उच्चतम गुणांची टक्केवारी.

(ब) कमीत कमी प्रयत्नांमध्ये उच्च माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण.

(क) पीसीबी / पीसीएम गटातील विषयांचे अधिकतम गुण,

(ड) इयत्ता १० वी मध्ये उच्चतम गुणांची टक्केवारी.

(इ) वयाने मोठा असलेला उमेदवार.

(उ) प्रथम ऑनलाईन प्रवेश अर्ज क्रमांक

३.९ **प्रवेश अर्ज व त्यासोबतची संबंधित कागदपत्रे संकेतस्थळावर अपलोड केल्यानंतर टपालाने / कुरीअरने / हातबटवडयाने कोणतीही अतिरिक्त कागदपत्रे स्वीकारली जाणार नाहीत.**

३.१० **उमेदवारांनी** त्यांना पाहिजे असलेल्या महाविद्यालयामध्ये प्रवेश घेण्यासाठी **प्राधान्यक्रमाने अर्जामध्ये जास्तीत जास्त विकल्प द्यावेत.** त्यासाठी संबंधित महाविद्यालयाच्या सांकेतांकांचा वापर करावा. **प्रवेश अर्ज पूर्णपणे अपलोड झाल्यानंतर प्रवेश अर्जामध्ये / विकल्पामध्ये बदल करता येणार नाही.** बाहेरील राज्यातील उमेदवार केवळ व्यवस्थापन कोटयातून प्रवेशासाठी पात्र असल्याने त्यांना ऑनलाईन प्रवेश अर्ज दाखल करतेवेळी विकल्प उपलब्ध असणार नाहीत. त्यांनी संस्थेच्या व्यवस्थापनाशी संपर्क साधून प्रवेशविषयक प्रक्रिया करावी.

३.११ (i) **उमेदवाराने सर्व रकान्यांमध्ये अचूक माहिती द्यावी.**

(ii) उमेदवाराने भरलेल्या अर्जामध्ये कोणत्याही प्रकारची **त्रुटी राहिल्यामुळे उमेदवाराची गुणवत्ता घसरल्यास, त्याबाबत 'केटीपीएल' किंवा कृषी परिषद जबाबदार राहणार नाही.**

३.१२ अंतिम गुणवत्ता यादी जाहीर झाल्यानंतर **गुणवत्ता यादीतील स्थान, उमेदवाराने दिलेले विकल्प, लागू असलेले आरक्षण आणि उपलब्ध जागा विचारात घेऊन प्रवेश दिले जातील.**

३.१३ उमेदवाराने दिलेल्या **विकल्पानुसार प्रथमतः राज्यस्तरावरील (‘एम’ कोटा) उपलब्ध जागांमधून प्रवेशासाठी विचार केला जाईल. त्यानंतर विद्यापीठस्तरीय (‘यु’ कोटा) जागांवरील प्रवेशाबाबत विचार करण्यात येईल.**

३.१४ प्रवेशासाठी निवडलेल्या विद्यार्थ्यांची 'एम्' कोटा व 'यु' कोटयातील यादी प्रवेश वेळापत्रकामध्ये नमूद केलेल्या दिनांकांना **www.mcaer.org** & **maha-agriadmission.in** या संकेतस्थळांवर प्रसिध्द केली जाईल.

३.१५ प्रवेशोच्छुक उमेदवारांसाठी महत्वाच्या सूचना **परिशिष्ट 'ई'** मध्ये देण्यात आलेल्या आहेत.

३.१६ शासन परिपत्रक, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्र. संकीर्ण-२०११/(१०३)/११)/मशि-३, दि.१८/४/२०११ नुसार उमेदवाराने प्रवेश घेतेवेळी महाविद्यालयाकडे स्वच्छताविषयक बाबींसबंधी **परिशिष्ट 'एफ'** मध्ये माहिती देणे अनिवार्य आहे.

३.१७ शासन परिपत्रक, कृषी व पदुम विभाग, क्र. संकीर्ण-१५१७/प्र.क्र.१८५/६-अे, दि.५/६/२०१७ अनुसार ज्या उमेदवारांचे मतदार यादीमध्ये नाव नोंदविलेले नाही, अशा उमेदवारांनी मतदार यादीमध्ये नाव नोंदविण्याविषयी हमी पत्र व नमुना ६, ७, ८ व ८-अ व्यवस्थित भरून प्रवेश घेतेवेळी संबंधित महाविद्यालयाकडे जमा करावे.

## ४. प्रवेश कार्यपध्दती :

४.१ उमेदवाराने प्रवेश प्रक्रियेसंबंधी माहिती पुस्तिकेत दिलेला सर्व मजकूर काळजीपूर्वक वाचावा.

४.२ कृषी परिषद, पुणे ही राज्यातील कृषी विद्यापीठांकरिता 'केटीपीएल', पुणे यांच्यामार्फत प्रवेशप्रक्रिया राबवील.

४.३ **सक्षम प्राधिकाऱ्यामार्फत घेण्यात आलेल्या सामायिक प्रवेश परीक्षेमध्ये (MHT-CET / JEE / NEET / AIEEA-UG) सबंधित गटात (PCB / PCM) प्राप्त झालेल्या टक्केवारीच्या ७० टक्के गुण आणि पात्रता परीक्षेमध्ये / इ. १२ वी (विज्ञान) परीक्षेमध्ये प्राप्त झालेल्या टक्केवारीच्या ३० टक्के गुण तसेच इतर अधिभार विचारात घेऊन प्रवेशाची गुणवत्ता निश्चित करण्यात येईल.**

४.४ उमेदवाराने एकापेक्षा जास्त सामायिक प्रवेश परीक्षा दिलेल्या असल्यास / दोन्ही गटातून (PCB / PCM group) सामायिक प्रवेश परीक्षा दिलेली असल्यास, लागू असलेल्या ज्या सामायिक प्रवेश परीक्षेत / गटात जादा गुण असतील, त्या सामायिक प्रवेश परीक्षेचे / गटाचे गुण विचारात घेण्यात येतील.

४.५ **जागांचे वाटप खालीलप्रमाणे असेल.**

**(अ) प्रवेशक्षमतेच्या २० टक्के जागा व्यवस्थापन कोटा.**

**(ब) प्रवेश क्षमतेच्या उर्वरित ८० टक्के जागांपैकी-**

**-- ३० टक्के महाराष्ट्र कोटा. ('एम्' कोटा)**
**आणि**
**-- ७० टक्के जागा विद्यापीठस्तरीय कोटा ('यु' कोटा)**

४.६ ज्या उमेदवारांकडे महाराष्ट्राचे अधिवास प्रमाणपत्र आहे किंवा ज्या उमेदवाराच्या महाविद्यालय सोडल्याच्या दाखल्यावर महाराष्ट्र राज्यातील जन्म ठिकाण आहे किंवा महाराष्ट्र राज्यातील सक्षम प्रधिका-याकडील जन्म दाखला आहे. मात्र त्याने उच्च माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा राज्याबाहेरून उत्तीर्ण केली आहे, अशा उमेदवाराचा प्रवेशासाठी विचार **फक्त 'एम्' कोटयाकरिता करण्यात येईल.**

४.७ पदवी अभ्यासक्रमासाठी सर्व प्रवेश **गुणवत्तेनुसार आणि तात्पुरत्या स्वरुपाचे असतील.**

४.८ **maha-agriadmission.in** किंवा **www.mcaer.org** **या संकेतस्थळावर सर्वसाधारण गुणवत्ता यादी प्रसिध्द करण्यात येईल**. उमेदवार या संकेतस्थळावर गुणवत्ता यादी पाहू शकतील. **उमेदवारांना टपाल किंवा दूरध्वनीद्वारे त्यांच्या गुणवत्तेबाबत कळविले जाणार नाही.**

४.९ गुणवत्ता यादीबाबत तक्रार असलेल्या अर्जदारांनी, प्रवेश कार्यक्रमामध्ये नमूद केलेल्या दिनांकास किंवा त्यापूर्वी त्यांच्या तक्रारी, प्रवेश अर्ज नोंदणीच्यावेळी त्यांना पुरविण्यात आलेल्या 'लॉगइन् आय्डी' व 'पासवर्ड'च्या आधारे 'ऑन लाईन' सादर कराव्यात. **या मुदतीत उमेदवाराचा तक्रार अर्ज प्राप्त न झाल्यास त्याची/तिची तक्रार विचारात घेतली जाणार नाही.**

४.१० **उमेदवाराने त्याचा 'लॉग इन आय्डी' व 'पासवर्ड' वापरून संकेतस्थळावरून त्याला देण्यात येणाऱ्या तात्पुरत्या प्रवेश वाटप पत्राची मुद्रित प्रत प्राप्त करून घेऊन प्रवेश दिलेल्या महाविद्यालयात स्वतः सर्व कागदपत्रांच्या मूळ प्रतींसह विहित दिनांकास अथवा त्यापूर्वी उपस्थित रहावे. गंभीर वैद्यकीय कारणास्तव उमेदवार उपस्थित राहू शकत नसल्यास परिशिष्ट 'जी' येथील प्राधिकार पत्राप्रमाणे उपस्थिती नोंदवावी. अन्यथा असा उमेदवार प्रवेशासाठी अनुपस्थित राहिला असे समजण्यात येऊन त्याचा प्रवेश आपोआपच रद्द झाला आहे, असे समजण्यात येईल.**

४.११ (अ) प्रवेश माहिती पुस्तिकेत नमूद केलेल्या तारखेस उमेदवाराला उपलब्ध रिक्त जागांवर गुणवत्तेनुसार प्रवेश दिला जाईल.

**(ब) प्रवेशानंतर कोणत्याही वेळी, उमेदवाराने खोटी माहिती पुरवून प्रवेश घेतला आहे, असे आढळून आल्यास असा प्रवेश विद्यापीठ रद्द करील.**

(क) एखाद्या प्रकरणी विद्यापीठाने अशी कारवाई केली नसल्याचे निदर्शनास आल्यास असा प्रवेश रद्द करण्यासाठी महासंचालक, कृषी परिषद हे सक्षम असतील.

(ड) प्रवेश फेऱ्यांच्या दरम्यान किंवा प्रवेशानंतर कोणत्याही वेळी संगणकप्रणालीमधील तांत्रिक बिघाडामुळे किंवा इतर कोणत्याही चुकीमुळे प्रवेश झाला असे आढळून आल्यास अशा उमेदवाराचा प्रवेश महासंचालक, कृषी परिषद हे रद्द करतील.

४.१२ (i) **उमेदवाराचा प्रवर्ग आणि / किंवा अतिरिक्त दिलेले गुण चुकीचे दर्शविले गेले असल्याचे,** प्रवेश घेतेवेळी मूळ कागदपत्रे व प्रमाणपत्रे यांच्या **छाननीच्या वेळी निदर्शनास आल्यास, असा उमेदवार प्रवेश मिळण्यास पात्र ठरणार नाही.**

(ii) सहयोगी अधिष्ठाता / प्राचार्य यांनी याबाबतची वस्तुस्थिती 'केटीपीएल' आणि कृषी परिषद यांना **ई-मेल, दूरध्वनी तसेच फॅक्सद्वारे तात्काळ कळवावी.**

(iii) 'केटीपीएल' द्वारा अंतिम यादी पुन्हा सुधारित करण्यात येईल आणि सदर उमेदवार त्याच्या सुधारित **गुणानुक्रमानुसार पुढील प्रवेश फेरीद्वारे प्रवेशास पात्र राहील.**

४.१३ (i) एखाद्या उमेदवाराला प्रवेश वाटपाबाबत तक्रार करायची असल्यास, **संबंधित प्रवेश वाटप फेरीच्या कालावधीतच कृषी परिषदेचे महासंचालक** यांच्याकडे उमेदवार तक्रार अर्ज दाखल करू शकेल.

(ii) अशा तक्रारीबाबत तात्काळ शहानिशा करून यथायोग्य कार्यवाही करण्यास महासंचालक, कृषी परिषद हे सक्षम असतील.

४.१४ पदवी अभ्यासक्रमासाठी घेतलेला प्रवेश अंतिम राहील. प्रवेश घेतलेला असा उमेदवार विद्यापीठ / महाविद्यालय / अभ्यासक्रम यामध्ये कोणताही बदल करण्यास पात्र राहणार नाही.

४.१५ **कोणत्याही उमेदवाराची असा प्रवेश नाकारण्याची इच्छा असल्यास** आणि पुढील प्रवेश फेरीसाठी त्याचा/तिचा विचार व्हावा, असे वाटत असल्यास, त्याने / तिने **संकेतस्थळावर लॉग-इन मध्ये डेबीट कार्ड / क्रेडीट कार्ड / नेट बँकींगद्वारे रू.२००/- ऑनलाईन अदा करून प्रवेश नाकारावा.**

४.१६ **एखाद्या विद्यार्थ्याने रु.२००/- फी भरुन त्याचा / तिचा प्रवेश नाकारला नाही किंवा प्रवेश वाटपानुसार प्रवेशही घेतला नाही तर त्याचा / तिचा 'जागेवर प्रवेश फेरी' या फेरीखेरीज नंतरच्या प्रवेश फेरीसाठी विचार केला जाणार नाही.**

४.१७ प्रवेशित विद्यार्थी पुढील प्रवेश फेऱ्यांद्वारे प्रवेशास पात्र असणार नाही. मात्र प्रवेश वाटपानुसार प्रवेश घेतल्यानंतर प्रवेश प्रक्रियेच्या कालावधीमध्ये विद्यार्थ्याने प्रवेश रद्द केल्यास / प्रवेश वाटप नाकारल्यास असा विद्यार्थी प्रवेश रद्द / नाकारलेला विकल्प वगळता पुढील ऑनलाईन प्रवेश

फेऱ्यांद्वारे इतर विकल्पांकरिता प्रवेशासाठी पात्र असेल. प्रवेश नाकारण्यासाठी दिलेल्या कालावधीमध्ये प्रवेश रद्द करता येतील.

४.१८ **प्रवेश रद्द केल्यानंतर शुल्काचा परतावा** :

(i) प्रवेशाची नोंदणी केल्यानंतर व वर्ग सुरु होण्यापूर्वी विद्यार्थ्याने प्रवेश रद्द केल्यास, विद्यार्थ्याकडून **प्रवेश प्रक्रिया शुल्कापोटी कमाल रू.१०००/- रक्कम कपात करण्यात येईल.**

(ii) **प्रवेशाची नोंदणी केल्यानंतर व वर्ग सुरु झाल्यानंतर विद्यार्थ्याने प्रवेश रद्द केल्यास वर्ग सुरु झालेल्या महिन्यापासून ज्या महिन्यामध्ये प्रवेश रद्द केला असेल, त्या महिन्यापर्यंत दरमहा होणारे सत्र आधारित शिक्षण शुल्क व दरमहा होणारे वसतीगृह शुल्क** (वसतीगृह उपलब्ध करून दिलेले असल्यास) संबंधित विद्यार्थ्याकडून **वसूल करण्यात येईल.**

(iii) वर्ग सुरु झाल्यानंतर राबविण्यात आलेल्या प्रवेश फेरीद्वारे प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्याने नोंदणी करून प्रवेश रद्द केल्यास, **नोंदणी केलेल्या तारखेच्या महिन्यापासून ज्या महिन्यामध्ये प्रवेश रद्द केला असेल, त्या महिन्यापर्यंत दरमहा होणारे सत्र आधारित शिक्षण शुल्क व दरमहा होणारे वसतीगृह शुल्क (वसतीगृह उपलब्ध करून दिलेले असल्यास) संबंधित विद्यार्थ्याकडून वसूल करण्यात येईल.**

४.१९ प्रवेश प्रक्रियेसंबंधीची तसेच राज्यस्तरीय ('एम' कोटा) व विद्यापीठस्तरीय ('यु' कोटा) ची गुणवत्ता यादी आणि प्रवेश फेऱ्यांप्रमाणे प्रवेशासंबंधीची सद्यस्थिती याबाबतची माहिती **maha-agriadmission.in** व **www.mcaer.org** या संकेतस्थळांवर उपलब्ध राहील.

४.२० महाविद्यालयांचे सहयोगी अधिष्ठाता / प्राचार्य यांच्यासाठी महत्वाच्या सूचना **परिशिष्ट 'एच'** येथे दिलेल्या आहेत.

४.२१ उमेदवाराचा दुर्लक्षितपणा, दिरंगाई, कोणत्याही प्रकारचे तांत्रिक बिघाड किंवा त्याच्या इतर खाजगी कारणांमुळे तो प्रवेशापासून वंचित राहिल्याबाबत **कोणत्याही प्रकारची तक्रार विचारात घेतली जाणार नाही.**

## ५. राखीव जागांचा तपशील.

महाराष्ट्र कृषी विद्यापीठे अधिनियम, १९८३ मधील तरतुदी, तसेच वेळोवेळी शासन निर्णयाद्वारे निर्देशित केल्याप्रमाणे विशिष्ट जागा, महाविद्यालयांमधील प्रवेशासाठी राखून ठेवण्यात आल्या आहेत-

| अ. क्र. | आरक्षण संवर्ग | टक्केवारी | अ. क्र. | इतर आरक्षण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| (१) | अनुसूचित जाती / नवबौध्द (एस्सी) | १३ | (८) | स्वातंत्र्य सैनिकाचे पाल्य (एफ्एफ्) | २ |
| (२) | अनुसूचित जमाती (एस्टी ) | ०७ | (९) | अपंग (कमी दिसणे, कमी ऐकणे, चालणे व्यंगत्व किंवा मणक्याचे व्यंगत्व) (पीएच) | ३ |
| (३) | विमुक्त जाती (अ) (व्हीजे -ए) (१४ व इतर) | ०३ | (१०) | आजी व माजी सैनिकांची मुले (डीपी) | २ |
| (४) | भटक्या जमाती (ब) (एन्टी-बी) (१९९० पूर्वीच्या सूचीप्रमाणे २८ व इतर) | २.५ | (११) | प्रकल्पामुळे विस्थापित झालेल्या व्यक्तींची मुले. (पीएपी) महाराष्ट्र प्रकल्प पुनर्वसन अधिनियम, १९७६ प्रमाणे प्रकल्पपीडित. | ४ |
| (५) | भटक्या जमाती (क) (एन्टी - सी ) | ३.५ | (१२) | शेतकरी व विहित किमान अर्हता असलेले किंवा कृषीविषयक अनुभव असलेली शेतक-यांची मुले. (अेजी) | ६ |
| (६) | भटकया जमाती (ड) (एन्टी - डी) (वंजार, वंजारी, वंजारा) | ०२ | (१३) | महिला | ३० |
| (७) | इतर मागास वर्गीय (ओबीसी) | १९ | (१४) | अनाथ मुले | १ |
| | एकूण | ५० | | | |

**टीप-**

(१) अ.क्र. ८ ते १३ हे आरक्षण खुला व आरक्षण संवर्गामध्ये गुणवत्तेनुसार समाविष्ट राहतील. अ.क्र. १४ हे आरक्षण खुल्या प्रवर्गात गुणवत्तेनुसार समाविष्ट राहील.

(२) इतर आरक्षणांतर्गत अ.क्र. १३ येथील महिलांच्या विशेष आरक्षणास त्या त्या प्रवर्गासाठी विहित

(३) करण्यात आलेल्या टक्केवारीनुसार वाटा निश्चितपणे मिळावा यासाठी सामान्य प्रशासन विभाग, परिपत्रक क्र.एसआरव्ही-१०९७/प्र.क्र.३१/९८/१६-अ, दि.१६/३/१९९९ मध्ये नमूद केलेली कार्यपध्दती अनुसरण्यात येईल. प्रस्तुत शासन परिपत्रक **परिशिष्ट 'आय'** येथे जोडले आहे.

(४) 'विशेष मागास प्रवर्गीय' उमेदवारांची जात, सुरुवातीस ज्या 'इतर मागास प्रवर्गा'मध्ये समाविष्ट होती, त्या 'इतर मागास प्रवर्गा'च्या आरक्षणासाठी असा उमेदवार पात्र समजण्यात येईल.

(५) महाविद्यालयनिहाय जागांचे वाटप करण्यात येईल.

महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी दिलेल्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे वरील आरक्षणाची अंमलबजावणी करण्यात येईल.

प्रवेश प्रक्रियेदरम्यान एखाद्या आरक्षित संवर्गामध्ये उमेदवार उपलब्ध न झाल्यास सदर जागा शासन निर्णय, कृषी व पदुम विभाग, क्र. मकृवि २०१०/प्र.क्र. १५५ / ७ अे, दि.२०/१०/२०११ मधील कार्यपध्दतीप्रमाणे भरण्यात येतील. सदर शासन निर्णय **परिशिष्ट- 'अे'** येथे दर्शविण्यात आला आहे.

## ६. गुणाधिभार / अतिरिक्त गुण

विद्यापीठाच्या अभ्यासक्रमनिहाय प्रवेशासाठी उमेदवारास खालील प्रमाणे गुणाधिभार / अतिरिक्त गुण देण्यात येतील.

(१) खालील व्यावसायिक / ऐच्छिक विषय / पदविकासह उमेदवार उच्च माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा (१० + २ परीक्षा पध्दती) उत्तीर्ण झालेला असल्यास, खालील अतिरिक्त गुण लागू असतील.

| | | सांकेतांक | गुणाधिभार / अतिरिक्त गुण |
|---|---|---|---|
| **(अ)** | **बी. एससी. (ऑनर्स) (कृषी व्यवसाय व्यवस्थापन)** | | **१०** |
| | (१) पुस्तपालन व लेखाकर्म | ५० | |
| | (२) पीक उत्पादन / कृषी विज्ञान व तंत्रज्ञान | ७५ | |
| | (३) पशु विज्ञान / पशुविज्ञान आणि तंत्रज्ञान | ७६ | |
| | (४) पीकशास्त्र | बी-४ | |
| **(ब)** | **बी. एस्सी. (ऑनर्स) (पशुसंवर्धन)** | | |
| | (१) पशुविज्ञान व दुग्धव्यवसाय | बी-२ | |
| | (२) पीकशास्त्र | बी-४ | |
| | (३) उद्यानविद्या | बी-५ | |
| | (४) पीक उत्पादन / कृषी विज्ञान व तंत्रज्ञान | ७५ | |
| | (५) पशुविज्ञान / पशुविज्ञान आणि तंत्रज्ञान | ७६ | |
| | (६) ग्रामीण कृषी विज्ञान संस्था अमरावती व वर्धा येथील पदविका | बी-१ | |
| | (७) कृषी शाळा पदविका (१२ वी परीक्षा पास झालेले) | डी-२ | |

(२) मत्स्य व्यवसाय करणाऱ्या कुटुंबातील किंवा शेती व्यवसाय करणाऱ्या कुटुंबातील उमेदवार, ज्यांची स्वतःची अथवा त्यांचे आई -वडील /आजी-आजोबांच्या (वडीलांकडून) नावे शेतजमीन असल्याबाबत ७/१२ चा उतारा किंवा भूमिहीन शेतमजूर किंवा शेतकरी असल्याबाबतचे बंदर अधिकारी / तहसीलदार / नायब तहसीलदार यांचे प्रमाणपत्र. **१२ पॉईंटस्**

(३) राष्ट्रीय छात्रसेना 'बी' किंवा 'सी' प्रमाणपत्र /हवाईदल /सेना/नौदल विभागाचे प्रमाणपत्र /राष्ट्रीय सेवा योजनेमध्ये किमान २४० तास काम केलेले / विशेष शिबीर केलेले प्रमाणपत्रधारक. **२ पॉईंटस्**

(४) जिल्हा, राज्य, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय क्रीडास्पर्धामध्ये सहभाग घेतल्याचे प्रमाणपत्र धारक. — २ पॉईंटस्

(५) महाराष्ट्र राज्य कृषी विद्यापीठांच्या आस्थापनेवरील किंवा कृषी परिषद पुणे / महाराष्ट्र राज्यातील कृषी विद्यापीठांमध्ये प्रतिनियुक्तीवर काम केलेले आजी व माजी कर्मचारी यांचे पाल्य. — **३ पॉईंटस्**

(६) वादविवाद, निबंध स्पर्धा, वक्तृत्व या राज्यस्तरीय स्पर्धांमध्ये भाग घेतला असल्याबाबतचे प्रमाणपत्र. — **२ पॉईंटस्**

**२० गुणांपेक्षा अधिकचा अधिभार अनुज्ञेय राहणार नाही.**

**७. शिक्षण पध्दती :**

- राज्यातील कृषी विद्यापीठांमध्ये 'विषय - अधिभार पध्दती'ने प्रत्येक शैक्षणिक वर्ष दोन सत्रांमध्ये विभागले आहे आणि २० आठवडयांपेक्षा कमी कालावधी नसलेल्या कालावधीस 'षण्मासिक सत्र' असे म्हणतात.
- शैक्षणिक कार्यक्रमामध्ये शिकविले जाणारे विषय निरनिराळया सत्रांमध्ये विभागले जाऊन वर्गातील व्याख्यान, प्रात्याक्षिके / शेतावरील प्रात्यक्षिके, ग्रंथालयातील वाचन व गृहपाठ इत्यादीप्रकारे शिकविले जातात.
- विद्यार्थी / विद्यार्थिनी, विषयाची निवड, घ्यावयाचे एकूण अधिभार, विद्यार्थ्याच्या सल्ला समितीच्या मार्गदर्शनाखाली प्रचलित नियमाप्रमाणे आणि विद्यार्थ्यांची / विद्यार्थिनींची शैक्षणिक प्रगती पाहून करतो / करते.
- विद्यार्थ्याची / विद्यार्थिनींची शैक्षणिक प्रगती समाधानकारक नसेल तर तो काही विषय ज्या वेळी शिकविण्यासाठी उपलब्ध असतील त्या वेळी पुन्हा घेऊ शकतो / शकते.
- पाचव्या अधिष्ठाता समितीच्या शिफारशीप्रमाणे विविध पदवी अभ्यासक्रमातील प्रवेशित उमेदवारांना सातव्या व आठव्या सत्रामध्ये 'विद्यार्थी ग्रामीण व उद्योजकता जागरुकता योजनेचा अभ्यासक्रम' पूर्ण करावा लागेल.

  अंमलबजावणीची पध्दतीः- कार्यानुभाधिष्ठीत शिक्षण / Hands on training, कौशल्यविकास प्रशिक्षण, ग्रामीण कृषी कार्यानुभव, रोपण प्रशिक्षण / औद्योगिक आवड, विद्यार्थी प्रकल्प.

- सन २०१३-१४ या शैक्षणिक वर्षापासून पहिल्या वर्षात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना लेखी व प्रात्याक्षिक परीक्षांमध्ये उत्तीर्ण होण्यासाठी प्रत्येकी किमान ५५ टक्के गुण अनिवार्य असतात. तसेच त्या त्या विषयाच्या लेखी व प्रात्यक्षिक परिक्षेमध्ये प्रत्येकी किमान ४० टक्के गुण अनिवार्य असतात.
- पदवी अभ्यासक्रम पूर्ण करण्याची कालमर्यादा ८ वर्ष असून यापेक्षा १ वर्ष अधिक कालावधी वाढवून द्यावयाचा झाल्यास विद्यार्थ्याच्या गंभीर कारणाबाबत शहानिशा करून संबंधित कृषी विद्यापीठाच्या विद्या परिषदेकडून योग्य तो निर्णय घेण्यात येईल. अशी कालमर्यादा वाढवून दिलेल्या विद्यार्थ्यास वसतीगृह सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार नाही. जागा रिक्त असल्यास देण्यात येईल.
- शैक्षणिक नियमावलीमध्ये आवश्यकतेनुसार वेळोवेळी बदल करून सुधारीत शैक्षणिक नियमावली तयार करण्यात येते. सुधारीत शैक्षणिक नियमावली शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना लागू असते.
- भारतीय कृषी अनुसंधान परिषदेच्या पाचव्या अधिष्ठाता समितीने शिफारशीत केलेले नियम प्रवेशित विद्यार्थ्यांना लागू राहतील.

## ८. नोंदणी

प्रवेश अर्ज आणि मूळ प्रमाणपत्रे सहयोगी अधिष्ठाता / प्राचार्य यांनी तपासल्यानंतर विद्यार्थ्यास नोंदणी करण्यासाठी परवानगी देण्यात येते आणि सहयोगी अधिष्ठाता / प्राचार्य यांचे कार्यालयात विद्यार्थी शुल्क भरतात .

## ९. वैद्यकीय तपासणी

- ❖ प्रथम वर्षात प्रवेशित प्रत्येक विद्यार्थ्यास विद्यापीठ / सहयोगी अधिष्ठाता / प्राचार्य यांचे निर्देशानुसार जिल्हा शल्यचिकित्सक / ग्रामीण वैद्यकीय अधिकारी / प्राथमिक स्वास्थ्य केंद्र यांच्याकडून पहिले सत्र संपण्यापूर्वी वैद्यकीय तपासणी करून घेणे अनिवार्य आहे.
- ❖ वैद्यकीय तपासणीत विद्यार्थ्यामध्ये  व्यंग आढळून आल्यास महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता संबंधित विद्यार्थ्यास आणि त्याच्या आई - वडील / पालक यांना वैद्यकीय सुधारणेसाठी कळवतील.
- ❖ **विद्यार्थी वैद्यकीयदृष्टया अपात्र ठरल्यास त्यास विद्यापीठातून काढून टाकण्यात येईल.**
- ❖ अशी प्रकरणे कुलसचिव यांना पुढील कार्यवाहीस्तव सादर करण्यात येतील.

- विद्यापीठ/ सहयोगी अधिष्ठाता यांनी आयोजित केलेल्या वैद्यकीय तपासणीसाठी विद्यार्थी गैरहजर राहिल्यास विद्यार्थ्याला स्वखर्चाने प्राधिकृत वैद्यकीय अधिकाऱ्याकडून तपासणी करुन तपासणी अहवाल विहित केलेल्या मुदतीमध्ये महाविद्यालयास सुपूर्द करावा लागेल.
- **एखाद्या विद्यार्थ्याने वैद्यकीय तपासणी अहवाल विहित मुदतीत सादर केला नाही, तर अशा विद्यार्थ्याचा निकाल घोषित केला जाणार नाही.**

## १०. विद्यार्थी मार्गदर्शन पध्दत

सर्व महाविद्यालयात विद्यार्थ्यांना शैक्षणिक तथा इतर कार्यासंबंधी मार्गदर्शन करण्यासाठी समुपदेशन पध्दत अवलंबिली जाते. यामुळे त्याचा वैयक्तिक विकास होतो. विद्यार्थ्याचा समुपदेशक (पाल्य प्राध्यापक) विद्यार्थ्याच्या प्रगती विषयी जागरुक असतो.

## ११. उपस्थिती

- प्रत्येक विद्यार्थ्यास वर्गात, प्रात्यक्षिक , ग्रंथालयातील काम, विस्तार शिक्षण संबंधी भेटी, शैक्षणिक सहली आणि प्राध्यापक व संबंधीत शिक्षक यांच्या बैठकीस हजर राहाणे आवश्यक आहे.
- **एखाद्या विद्यार्थ्याची हजेरी ८० टक्यापेक्षा कमी असल्यास त्याला त्या सत्राची परीक्षा देण्यासाठी अपात्र ठरविण्यात येईल** व त्या विषयात अनुत्तीर्ण असा शेरा दिला जाईल (एफ् ग्रेड).
- अशा विद्यार्थ्यास त्या विषयासाठी पुन्हा नोंदणी करावी लागेल.

## १२. शैक्षणिक सहल.

पदवी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांसाठी प्रत्येक महाविद्यालयात निधी उपलब्ध झाल्यास, खालील प्रमाणे शैक्षणिक सहली आयोजित करण्यात येतात.

(१) व्दितीय वर्ष - महाराष्ट्र राज्य

(२) तृतीय वर्ष - दक्षिण भारत

(३) चतुर्थ वर्ष - उत्तर भारत

## १३. खेळ आणि इतर कार्यक्रम.

प्रत्येक महाविद्यालयात क्रीडा आणि त्यासंबंधी कार्यक्रम राबविण्यासाठी सोयी सुविधा उपलब्ध आहेत.

## १४. वसतीगृह

काही मर्यादित संख्येपर्यंत विद्यार्थ्यांसाठी काही महाविद्यालयांमध्ये वसतीगृहाची सोय उपलब्ध आहे. घटक महाविद्यालयात प्रवेशित प्रत्येक विद्यार्थ्याला वसतिगृहाची सोय उपलब्ध करुन देणे बंधनकारक किंवा आश्वासित नाही.

## १५. पदके, नगदी बक्षीसे आणि पारितोषिके.

निरनिराळया पदवी परीक्षांमधील उच्चतम गुणवत्ताधारक पदवी विद्यार्थ्यांना विद्यापीठाच्या नियमानुसार पदके, नगदी बक्षीसे आणि पारितोषिके देण्यात येतात.

## १६. शिष्यवृत्ती आणि सवलती.

बी. एससी. (ऑनर्स) (कृषी व्यवसाय व्यवस्थापन) व बी. एस्सी. (ऑनर्स) (पशुसंवर्धन) हे पदवी अभ्यासक्रम व्यावसायिक म्हणून घोषित करण्यात आलेला नसल्याने, व्यावसायिक अभ्यासक्रमात शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना ज्या शैक्षणिक सवलती / शिष्यवृत्ती / शैक्षणिक शुल्काची प्रतिपूर्ती देण्यात येतात, त्या सवलती बी. एससी. (ऑनर्स) (कृषी व्यवसाय व्यवस्थापन) व बी. एस्सी. (ऑनर्स) (पशुसंवर्धन) अभ्यासक्रमात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना अनुज्ञेय राहणार नाहीत.

## १७. वर्तणूक आणि शिस्त

(१) विद्यापीठामध्ये वेळोवेळी सुधारित व अस्तित्वात असलेल्या नियम व विनियमानुसार कॉपी प्रकरणे आणि गैरवर्तणुकीची प्रकरणे हाताळली जातात.

(२) विद्यापीठ संवैधानिक नियमावली, १९९० मध्ये केलेल्या तरतुदीन्वये **महाविद्यालयातील विद्यार्थी, रॅगिंग, अपहरण आणि इतर गैरशिस्तीच्या प्रकरणात आढळून आल्यास त्यास त्या महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता पूर्वसूचना न देता महाविद्यालयातून तसेच वसतिगृहातून ताबडतोब निलंबित करतील** आणि अशा विद्यार्थ्यास उप महासंचालक (शिक्षण), पत्र क्र. ६(२३)/२००७ ए व पी. दि.१८/१/०८ नुसार **मा. सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली यांनी विशेष याचिका अपील (सी) (सन २००४ चे (सी) [२४२९५ व २४२९६-९९] मध्ये दि. १०/१२/२००१ रोजी दिलेले आदेश** आणि डॉ.राघवन समितीच्या अहवालाच्या आधारे (डी.क्र. ३७०/०४/XI-अे, दि.२६/०२/२००९) व कृषी व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई पत्र क्र. अेजीयु-२००९/प्र.क्र.५८/७-अे, दि.६/५/२००९ नुसार, **माननीय कुलगुरु यांच्या आदेशाप्रमाणे महाविद्यालयातून काढून टाकण्यात येईल.**

(३) महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषदेने केलेल्या नियम व विनियमांचे पालन करणे विद्यार्थ्यांवर बंधनकारक राहील.

(४) **कोणत्याहीप्रकारची बेशिस्त किंवा गैरवर्तणूक ही रॅगिंगविरोधी कायदा, १९९९ च्या तरतुदीनुसार शिक्षापात्र गुन्हा ठरते.**

(५) रॅगिंगविरोधी कायदा : रॅगिंगच्या प्रकरणामध्ये २४ X ७ रॅगिंगविरोधी कायदेशीर मदत मिळण्यासाठी **१८००-१८०-५५२२** या टोल-फ्री क्रमांकावर संपर्क साधावा. ई-मेलः'**helpline@antiragging.net**' आणि संकेतस्थळ : '**http://www.ugc.ac.in**'

(६) प्रत्येक विद्यार्थी आणि त्याचे आई-वडील / पालक यांनी 'रॅगिंग विरोधी कायदा, १९९९ मधील तरतुदींचे आम्ही पालन करू,' असे **'<u>परिशिष्ट जे</u>'** येथील हमीपत्र देणे गरजेचे आहे. तसेच आम्ही शैक्षणिक संस्थांमध्ये वसतीगृह परिसर आणि विद्यापीठ परिसरामध्ये शिस्त व वर्तणूक चांगली ठेऊ अशीदेखील खात्री देणे आवश्यक आहे.

## १८. शुल्क ¥

**पदवी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांनी भरावयाच्या शुल्काचा तपशील (रुपयांमध्ये)**

| अ. क्र. | बाब | पदवी | |
|---|---|---|---|
| | | प्रथम सत्र | द्वितीय सत्र |
| | **अ) महाविद्यालय शुल्क** | | |
| | विना अनुदानित महाविद्यालयांसाठी शिक्षण शुल्क | २२५००<br>३७५००** | २२५००<br>३७५००** |
| २ | नोंदणी शुल्क | ४०० | ४०० |
| ३ | पात्रता शुल्क # | ४००<br>८०० ⊗ | -- |
| ४ | महाविद्यालय तारण धन (caution money) | २०००© | -- |
| ५ | ग्रथांलय शुल्क | ८०० | ८०० |
| ६ | विद्यार्थी परिषदेच्या विविध बाबींसाठीची वर्गणी | | |
| | एक) खेळ, जिमखाना व इतर गतीविधी | १००० | १००० |
| | दोन) विद्यार्थी सहकारी संस्था (भांग भांडवल +सभासद शुल्क) | २०० # | -- |
| | तीन) वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ | ४०० | -- |
| | चार) महाविद्यालय नियतकालिक | ४०० | -- |
| | पाच) अश्वमेध क्रीडा शुल्क | ५० | -- |
| ७ | विद्यापीठ वैद्यकीय तपासणी शुल्क | २०० | -- |
| ८ | ओळखपत्र | १०० # | -- |
| ९ | विद्यार्थी सहायता निधी | २०० # | -- |
| १० | श्रेणी पत्रिका शुल्क | २०० | २०० |

| अ. क्र. | बाब | पदवी | |
|---|---|---|---|
| | | प्रथम सत्र | द्वितीय सत्र |
| ११ | परीक्षा शुल्क | ३२०० | - |
| १२ | विद्यार्थी सुरक्षा विमा हप्ता | १०० | -- |
| | एकूण (अ) | ३२,१५० / ४७१५०** + [४००⊗ / ] | २४,९०० /३९,९००** |
| | **(ब) वसतिगृह** | | |
| १ | वसतिगृह हमी अनामत | ३०००© | -- |
| २ | देखभाल खर्च | ३००० | ३००० |
| ३ | विद्युत आकार | ३००० | ३००० |
| ४ | खाणावळ अनामत रक्कम | २०००© | -- |
| | एकूण (ब) | ११००० | ६००० |
| | एकूण (अ+ब) | ४३,१५० / ५८१५०** + [४००⊗ / ] | ३०,९०० / ४५,९००** |

**¥** प्रस्तुत शीर्षांतर्गत दर्शविण्यात आलेले शुल्क हे कृषी परिषदेच्या मान्यतेनुसार बदलण्यात येईल.

टीप- विनाअनुदानित महाविद्यालयातील व्यवस्थापन कोटयांतर्गत प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांनी भरावयाचे शिक्षण शुल्क-

| अभ्यासक्रम | व्यवस्थापन कोटा |
|---|---|
| बी. एस्सी. (ऑनर्स) (पशुसंवर्धन) | जास्तीत जास्त रु.१,९५,०००/- प्रती वर्ष |
| बी. एससी. (ऑनर्स) (कृषी व्यवसाय व्यवस्थापन) | जास्तीत जास्त रु.१,०५,०००/- प्रती वर्ष |

⊗ पात्रता परीक्षा महाराष्ट्र राज्याबाहेरून उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांनी भरावयाचे शुल्क.

** बी.एससी. (ऑनर्स) (पशुसंवर्धन) या अभ्यासक्रमांचे शिक्षण शुल्क. [बारामती जि. पुणे येथील बी.एससी. (ऑनर्स) (पशुसंवर्धन) व बी. एससी. (ऑनर्स) (कृषी व्यवसाय व्यवस्थापन) या अभ्यासक्रमाचे नेदरलॅन्ड येथील संबंधीत विद्यापीठातील वार्षिक शिक्षण शुल्क ६५०० युरो असेल.]

© विद्यार्थ्यांनी महाविद्यालय / वसतीगृह सोडतांनाचे परतावा शुल्क.

# हे शुल्क विद्यार्थ्यांच्या महाविद्यालयीन काळात एकदाच भरावयाचे आहे. हे शुल्क RAWE / RHWE / RFWE इत्यादी उन्हाळी प्रशिक्षण किंवा कार्यानुभव कार्यक्रमांतर्गत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना आकारले जाणार नाही.

**टीप-**

१. गुणपत्रिका / परीक्षा शुल्क संबंधित विद्यापीठात जमा करावे.

२. एकत्रित श्रेणीपत्रक / गुणपत्रक शुल्क आठव्या सत्राच्या नोंदणीच्या वेळी ज्या त्या विद्यापीठाकडे जमा करावे लागेल.

३. विद्यार्थी अनुत्तीर्ण झाल्यास संबंधित विषयाकरिता संपूर्ण वार्षिक परीक्षा शुल्क न आकारता संबंधित विषयापुरतेच परीक्षा शुल्क आकारण्यात येईल.

## १९. प्रवेश कार्यक्रम

पदवी प्रवेश प्रक्रियेचे सन २०१८-१९ साठीचे वेळापत्रक.

| अ. क्र. | कार्यक्रम | दिनांक |
|---|---|---|
| १. | प्रवेश प्रक्रियेस सुरुवात दिनांक | ०५/०७/२०१८ |
| २. | ऑनलाईन प्रवेश अर्ज व त्यासोबतची आवश्यक ती स्कॅन केलेली कागदपत्रे संकेतस्थळावर अपलोड करावयाचा अंतिम दिनांक | १६/०७/२०१८ |
| ३. | केटीपीएल व कृषी परिषदेच्या संकेतस्थळावर अंतरिम गुणवत्ता यादीची प्रसिध्दी. | १९/०७/२०१८ (संध्याकाळनंतर) |
| ४. | ऑनलाईन तक्रार नोंदणीचा अंतिम दिनांक. | २०/०७/२०१८ ते २२/०७/२०१८ |
| ५. | केटीपीएल व कृषी परिषदेच्या संकेतस्थळावर अंतिम गुणवत्ता यादीची प्रसिध्दी. | २७/०७/२०१८ |
| ६. | (i) पहिल्या प्रवेश फेरीच्या वाटप यादीची प्रसिध्दी. | २९/०७/२०१८ (संध्याकाळनंतर) |
| | (ii) रिपोर्टिंगचा अंतिम दिनांक | ०१/०८/२०१८ (सायं. ५.३० पर्यंत) |
| ७. | (i) दुसऱ्या प्रवेश फेरीच्या वाटप यादीची प्रसिध्दी. | ०४/०८/२०१८ (संध्याकाळनंतर) |
| | (ii) रिपोर्टिंगचा अंतिम दिनांक | ०७/०८/२०१८ (सायं. ५.३० पर्यंत) |
| ८. | (i) तिसऱ्या प्रवेश फेरीच्या वाटप यादीची प्रसिध्दी (रूपांतरासह) | ११/०८/२०१८ (संध्याकाळनंतर) |
| | (ii) रिपोर्टिंगचा अंतिम दिनांक | १४/०८/२०१८ (सायं. ५.३० पर्यंत) |
| ९. | **व्यवस्थापन कोटयांतर्गत प्रवेश** | १२ /०८/२०१८ व १६/०८/२०१८ |
| १०. | जागेवरील प्रवेश फेरीसाठी रिक्त जागांच्या तपशिलाची प्रसिध्दी | १७/०८/२०१८ |
| ११. | रिक्त असलेल्या जागा भरण्यासाठी संबंधित महाविद्यालयस्तरावर "जागेवर प्रवेश फेरी" ('परिशिष्ट के' मधील कार्यपध्दतीप्रमाणे) | १९ ते २२/०८/२०१८ |
| १२. | वर्ग सुरु होण्याचा दिनांक | २९/०८/२०१८ |

**टीप -**

(१) **रविवारी तसेच शासकीय सुटीच्या दिवशी प्रवेश फेरीच्या कालावधीत कामकाज चालू राहील.**

(२) व्यवस्थापन कोटयांतर्गत प्रवेशासाठी वरील दिनांक लागू राहील. व्यवस्थापन कोटयांतर्गत प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेशास संबंधित महाविद्यालयाने संबंधित विद्यापीठाकडून प्रवेश दिनांकापासून दहा दिवसांच्या आत मंजुरी घ्यावी. अशा मान्यतेबाबत कृषी परिषद कार्यालयास अवगत करण्यात यावे.

(३) **अनिवासी भारतीय उमेदवाराचे** गुणवत्ता यादीत नाव असल्याशिवाय ते प्रवेशास पात्र असणार नाहीत.

(४) वर अधिसूचित केल्याप्रमाणे **प्रवेश प्रक्रियेकरिता वेगळे मुलाखत पत्र देण्यात येणार नाही.**

या माहिती पुस्तिकेमध्ये विविध पदवी प्रवेशाचे नियम तसेच शैक्षणिक नियमावलीच्या सर्व अभ्यासक्रमाची थोडक्यात माहिती देण्यात आली आहे. सविस्तर माहितीसाठी प्रवेशाचे नियम व विनियम तसेच शैक्षणिक नियमावली पहावी.

**२०. 'केटीपीएल' चे संकेतस्थळ 'maha-agriadmission.in' दि. ०५ जुलै,२०१८ पासून कार्यरत राहील.**

**(रविंद्र जगताप) भा प्र से**
**महासंचालक**
**महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद,**
**पुणे-४११ ००७.**

## प्रवेशाकरिता महाविद्यालयस्तरावर तपासावयाच्या कागदपत्रांची सूची (Check List)

| अ.क्र. | प्रमाणपत्र / कागदपत्रांचा तपशील | आहे (√) / नाही (×) |
|---|---|---|
| (१) | **(अ) महाराष्ट्र राज्यातील सक्षम प्राधिका-याने दिलेले अधिवास प्रमाणपत्र किंवा जन्म ठिकाणाचा उल्लेख असलेले, महाविद्यालय / शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र किंवा सक्षम प्रधिका-याकडील जन्म दाखला.** | |
| | **(ब) बाहेरील राज्यातील उमेदवारांना सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले अधिवास प्रमाणपत्र / रहिवाशी दाखला / रहिवास व जन्मदाखला.** | |
| (२) | MHT-CET / NEET / AIEEA-UG सामायिक प्रवेश परीक्षेचे गुणपत्रक | |
| (३) | **उच्च माध्यमिक शालान्त परीक्षेचे प्रमाणपत्र** (एच्एस्एस्सी- इ.१२ वी) **गुणपत्रक** किंवा गुणविवरणपत्र. | |
| (४) | माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षेचे (एस्एस्सी- इ.१० वी) गुणपत्रक किंवा गुणविवरणपत्र. | |
| (५) | (अ) **महाविद्यालय सोडल्याचे / महाविद्यालय बदलीचे प्रमाणपत्र** (शेवटी शिकत असलेल्या) किंवा जेथे प्रवेश अगोदर मिळालेला आहे त्या महाविद्यालयाचे **बोनाफाईड** प्रमाणपत्र. | |
| | (ब) मागील शैक्षणिक वर्षात राज्यातील कृषी विद्यापीठांतर्गत पदवी शिक्षण घेत असलेल्या उमेदवारांसंदर्भात, चालू शैक्षणिक वर्षासाठी पहिल्या वर्षात प्रवेश घेण्याकरिता चालू शैक्षणिक वर्षापूर्वी प्रवेश घेतलेल्या **संबंधित महाविद्यालयाचे बोनाफाईड प्रमाणपत्र.** | |
| (६) | राज्यातील पदनिर्देशित सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले **'जात प्रमाणपत्र.'** | |
| (७) | अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती (क), भटक्या जमाती (ड), इतर मागासवर्ग आणि विशेष मागासप्रवर्ग या उमेदवारांचे **जात वैधता प्रमाणपत्र.** / जात वैधता प्रमाणपत्र मिळण्याकरिता अर्ज सादर केलेला असल्याची संबंधित कार्यालयाची पावती. | |
| (८) | दि. **१ एप्रिल,२०१८ किंवा त्यानंतर दिलेले किंवा अर्ज ज्या दिनांकास दाखल केला असेल, त्या दिनांकास ग्राह्य असलेले** उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे प्रमाणपत्र / उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे **(Non Creamy Layer)** प्रमाणपत्र मिळण्याकरिता अर्ज सादर केलेला असल्याची संबंधित कार्यालयाची पावती. | |
| (९) | (अ) मा.पंतप्रधान / मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांची स्वाक्षरी असलेले अर्जदाराच्या माता / पिता / आजी / आजोबा यांचे **'स्वातंत्र्य सैनिक असल्याबाबतचे प्रमाणपत्र'.** | |
| | (ब) **स्वातंत्र्य सैनिकाचे आणि जर स्वातंत्र्य सैनिक हयात नसल्यास स्वातंत्र्य सैनिकाच्या पती/पत्नीचे रु.१००/- च्या मुद्रांकावरील प्रतिज्ञापत्र.** | |
| | (क) असल्यास, खालील बाबी नमूद करण्यात आलेल्या आहेत काय? | |
| | (१) उमेदवार हा स्वातंत्र्यसैनिकाचा मुलगा / मुलगी किंवा त्यांच्या मुलाचा / मुलीचा मुलगा/ मुलगी आहे. | |
| | (२) स्वातंत्र्य सैनिकाने यापूर्वी कोणत्याही नातेवाईकासाठी ही सवलत घेतलेली नाही. | |

| अ.क्र. | प्रमाणपत्र / कागदपत्रांचा तपशील | आहे (√) / नाही (×) |
|---|---|---|
| | (३) यावेळी लाभ मिळाल्यास, यानंतर स्वातंत्र्य सैनिक कोणत्याही अन्य नातेवाईकासाठी ही सवलत घेणार नाही. | |
| (१०) | **संरक्षण दलातील कर्मचारी** असल्याबाबतचे जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी यांचे प्रमाणपत्र किंवा रेजिमेंटच्या समादेशक अधिकाऱ्याचे **प्रमाणपत्र** किंवा सक्षम प्राधिकाऱ्याचे 'सैनिक' असल्याबाबतचे प्रमाणपत्र. | |
| (११) | सक्षम जिल्हा शल्य चिकित्सक किंवा समतुल्य शासकीय रूग्णालय / वैद्यकीय मंडळाचे **'शारीरिक अपंगत्वाचे प्रमाणपत्र.'** [**विकलांगतेची टक्केवारी** शारिरीकदृष्टया अपंग प्रवर्गाकरिता आरक्षण मागणाऱ्या विद्यार्थ्याच्या बाबतीत, **४० टक्क्यांपेक्षा कमी असता कामा नये.**] | |
| (१२) | लाभार्थ्यांच्या नावे असणारी, विद्यार्थ्याच्या / विद्यार्थीनीच्या माता पित्याची अथवा आजोबा-आजीची जमीन कृषी विद्यापीठ / पाटबंधारे / वीज / संरक्षण प्रकल्प यासाठी शासनाने संपादित केली असल्याचे विहित नमुन्यातील महाराष्ट्र शासनाच्या जिल्हा पुनर्वसन अधिकाऱ्याने / किंवा शासनाने प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याने (प्राधिकृत केले असल्यास प्राधिकृत करण्यात आले असल्याच्या सक्षम अधिकाऱ्याच्या पत्रासह) **'प्रकल्प विस्थापित व्यक्तीकरिता दिलेले प्रमाणपत्र (पीएपी.)'.** | |
| (१३) | उमेदवार किंवा त्याचे माता-पिता किंवा आजा-आजी (पित्याकडून) शेतजमिनीचे मालक किंवा कूळ म्हणून शेतजमीन धारक आहे / आहेत आणि त्यांचे उत्पन्नाचे मुख्य साधन जमिनीच्या वैयक्तिक मशागतीतून आहे हे दर्शविणारे तहसिलदार / नायब तहसिलदारापेक्षा कनिष्ठ दर्जा नसलेल्या अधिका-याचे विहित नमुन्यातील / तहसीलदार किंवा नायब तहसीलदार यांनी दिलेले त्यांच्याकडील उपलब्ध असलेल्या विहित नमुन्यामध्ये सन २०१६-१७ किंवा २०१७-१८ या वर्षातील **'शेतकरी असल्याबाबतचे प्रमाणपत्र (एजी)'.** | |
| (१४) | (i) विद्यार्थी / विद्यार्थीनीच्या नावे किंवा माता-पिता / आजोबा-आजीच्या नावे शेतजमीन आहे, हे दर्शविणारा तलाठी / पटवारी याने दिलेला **सन २०१६-१७ किंवा २०१७-१८ वर्षाचा गाव ७/१२ उतारा / खसरा.**<br>(ii) आई / वडील हयात नसल्यास त्याच्या कुटुंब प्रमुख्याच्या नावावरील ७/१२ उतारा व कुटुंब प्रमुखाचे **रु.१००/- च्या मुद्रांकावर प्रतिज्ञापत्र.**<br>**(iii) हा उतारा मराठी/ हिंदी किंवा इंग्रजी भाषेमध्ये नसल्यास, प्रमाणित अनुवादाची प्रत सोबत जोडावी.**<br>(iv) उमेदवाराच्या आईच्या वडिलोपार्जित शेतजमिनीमध्ये तीचा हिस्सा असेल तर आईच्या पित्याचे रु.१००/-च्या (शंभर रूपये फक्त) मुद्रांकावर केलेले शपथपत्र. | |
| (१५) | उमेदवाराच्या माता / पित्याचे उपजिविकेचे मुख्य साधन शेतजमिनीवरील शारीरिक श्रमाचे आहे, असा उल्लेख असणारे तहसिलदार / नायब तहसिलदाराचे **'भूमिहीन शेतमजुराचे प्रमाणपत्र'** (असे प्रमाणपत्र अर्जदाराच्या नावे नसावे.) तथापि, **अशा उमेदवारास 'शेतकरी' (एजी) प्रवर्ग लागू असणार नाही.** | |

| अ.क्र. | प्रमाणपत्र / कागदपत्रांचा तपशील | आहे (√) / नाही (×) |
|---|---|---|
| (१६) | उत्पन्नाचे साधन केवळ मच्छीमारी हाच व्यवसाय आहे, असा उल्लेख असणारे तहसिलदार / नायब तहसिलदार / बंदर अधिकारी यांचे **'मच्छिमार असल्याबाबतचे प्रमाणपत्र'**. | |
| (१७) | **राष्ट्रीय छात्रसेने**चे (एनसीसी) **'ब' किंवा 'क' प्रमाणपत्र** किंवा समादेशक अधिकाऱ्याचे (वायु /नौसेना / सैन्यदल) (अकरावी किंवा बारावी इयत्तेमध्ये उत्तीर्ण झालेले). | |
| (१८) | अर्जदाराने महाविद्यालयात इयत्ता **अकरावी आणि / किंवा बारावी मध्ये आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय, राज्य, जिल्हा क्रीडा स्पर्धांमध्ये सहभाग घेतला आहे, असे जिल्हा क्रीडा अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र**. | |
| (१९) | कनिष्ठ महाविद्यालयाच्या सक्षम प्राधिकाऱ्याचे **'एनएसएस (राष्ट्रीय सेवा योजना) प्रमाणपत्र'**. (किमान २४० तास काम केलेले / विशेष शिबीर केलेले). | |
| (२०) | **महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद / कृषी विद्यापीठ यांच्या कर्मचाऱ्यांचा पाल्य असल्याचे प्रमाणपत्र.** | |
| (२१) | इ.११ / १२ वी मध्ये जिल्हा, राज्य, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय वादविवाद/ निबंध स्पर्धा/वक्तृत्व स्पर्धांमध्ये प्रतिनिधीत्व करणाऱ्या उमेदवारांनी सादर केलेले जिल्हा क्रीडा अधिकारी यांचे प्रमाणपत्र. | |
| (२२) | सेवेत असलेले उमेदवार असल्यास संबंधित कार्यालय प्रमुखाचे **'ना हरकत प्रमाणपत्र'.** | |
| (२३) | स्वच्छताविषयक सुविधांबाबत **परिशिष्ट 'एफ'** मधील हमीपत्र. | |
| (२४) | संकेतस्थळावर अपलोड केलेल्या मूळ प्रतींच्या सत्यतेबाबत परिशिष्ट 'डी' मधील स्वयंघोषणा पत्र. | |
| (२५) | महिला व बालविकास विभाग, शासन निर्णय क्र. अमुजा २०११/प्र.क्र.२१२/का-३, दि.२/४/२०१८ अन्वये आयुक्त, महिला व बालविकास, पुणे यांच्या छापील लेटर हेडवरील उपायुक्त (बालविकास), पुणे / आयुक्त, महिला व बालविकास, पुणे यांच्या स्वाक्षरीचे अनाथ प्रमाणपत्र. | |

परिशिष्ट 'अ'

महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, पुणे
दिनांक 29 OCT 2011
आवक क्र.: ४२८२ शाखा: शिक्षण
सहसंचालक (प्रशा.)

२८५१

कृषी विद्यापीठांतर्गत पदवी, पदव्युत्तर व आचार्य पदवी अभ्यासक्रमामध्ये जागांचे आरक्षण, सामाजिक आरक्षणाच्या वाटपाची कार्यपध्दती व प्रवेश कार्यपध्दती निश्चित करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग,
शासन निर्णय क्रमांक : मकृवि २०१०/प्र.क्र. १५५/७अे
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- २० ऑक्टोबर २०११.

३१७

वाचा :- (१) शासन निर्णय, कृषी व पदुम विभाग, क्र.ओजीयु-२३८८/सीआर-७०/२०-अे, दि.२८/४/१९८९.
(२) शासन निर्णय, कृषी व पदुम विभाग, क्र.ओजीयु-२३८८/सीआर-७०/२०-ओ, दि.५/२/१९९०
(३) शासन निर्णय, कृषी व पदुम विभाग, क्र.ओजीयु-११९३/४९४७२/सीआर-२/१९-अे, दि.३०/६/१९९४
(४) शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, क्र.टीईएम ३३९७/१२९२६/ (९०८६) /तांशि-१, दि.११/७/१९९७.
(५) शासन निर्णय, कृषी व पदुम विभाग, क्र.कृषिवि २००२/ सीआर २६९/२०-अे, दि.२३/५/२००३.
(६) शासन निर्णय, कृषी व पदुम विभाग, क्र.कृषिवि २००३/ प्रक्र २२३/२०-ओ, दि.१६/३/२००४.
(७) महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद यांचे पत्र क्र. मकृप/शिक्षण- १/३३११/१३३६, दि.११/७/२०११

प्रस्तावना :

सन २०१०/११ या शैक्षणिक वर्षामध्ये प्रवेश प्रक्रियेंतर्गत 'अन्नतंत्रज्ञान' या पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी 'भटक्या जमाती' (Nomadic Tribes) या प्रवर्गाकरिता ११ टक्के जागा उपलब्ध करून दिल्या नसल्याच्या कारणास्तव मा.उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद येथे रीट याचिका क्र. ८६६३/२०१० दाखल करण्यात आली होती.

उपरोक्त याचिकेसंदर्भात मा.उच्च न्यायालयाने दि.२५/०४/२०११ रोजी दिलेल्या अंतिम आदेशाच्या अनुषंगाने राज्यातील कृषी विद्यापीठांतर्गत मागासवर्गीय विद्यार्थ्यांकरिता आरक्षित जागांवर शैक्षणिक प्रवेश देतांना या विद्यार्थ्यांवर अन्याय होऊ नये व ते प्रवेशापासून वंचित राहू नयेत, याबाबतचे धोरण ठरविण्याकरिता शासन निर्णय क्र. ओजीयु-२०१०/ प्र.क्र.१५५/ ७-ओ, दि.२६/४/२०११ नुसार मा.महासंचालक, महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली होती. सदर समितीने सादर केलेला अहवाल शासनाच्या विचाराधीन होता.

शासन निर्णय:-

राज्यातील चारही कृषी विद्यापीठांतर्गत पदवी अभ्यासक्रमाच्या घटक व अनुदानित महाविद्यालयांमध्ये प्रवेश क्षमतेच्या ५ टक्के जागा भारतीय कृषी अनुसंधान परिषदेच्या कोटयासाठी राखून ठेवण्यात याव्यात. पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या घटक व अनुदानित महाविद्यालयांमध्ये प्रवेश क्षमतेच्या १५ टक्के जागा भारतीय कृषी अनुसंधान परिषदेच्या कोटयासाठी राखून ठेवण्यात याव्यात. याव्यतिरिक्त पदवी व पदव्युत्तर

२८७१

अभ्यासक्रमाच्या घटक व अनुदानित महाविद्यालयांमध्ये प्रवेश क्षमतेपेक्षा १० टक्के अतिरिक्त जागा भारतीय कृषी अनुसंधान परिषदेकडून भरण्यात याव्यात.

उमेदवाराने ज्या तारखेला प्रवेश मागितला असेल त्या तारखेच्या लगतपूर्वीच्या १० वर्षे मुदतीमध्ये किमान तीन वर्षे ज्या व्यक्ती व ज्याच्या आईवडिलांनी या राज्यात निवास केलेला नसेल, अशा किंवा राज्याबाहेरील उमेदवारांकरिता (ओएस) पदवी, पदव्युत्तर व आचार्य पदवी अभ्यासक्रमाच्या घटक व अनुदानित महाविद्यालयांमध्ये २ टक्के जागा राखून ठेवण्यात याव्यात.

पदवी अभ्यासक्रमाच्या कायमस्वरूपी विना अनुदानित महाविद्यालयांमधील २० टक्के जागा व्यवस्थापन कोटयाकरिता राखून ठेवण्यात याव्यात. या जागांवर प्रवेश घेण्याकरिता फक्त केंद्रीय प्रवेश प्रक्रियेंतर्गत प्राप्त प्रवेश अर्जच ग्राह्य धरण्यात यावेत.

पदवी, पदव्युत्तर व आचार्य पदवी अभ्यासक्रमाच्या घटक व अनुदानित महाविद्यालयांमधील नमूद केलेल्या उपरोक्त जागा व कायमस्वरूपी विना अनुदानित महाविद्यालयांमध्ये व्यवस्थापन कोटयातील जागा वगळून, उर्वरित जागा खाली निर्देशित केलेल्या टक्केवारीनुसार राखून ठेवण्यात याव्यात.

(अ) सामाजिक आरक्षण

| अ.क्र. | संवर्ग | टक्केवारी |
|---|---|---|
| (१) | अनुसूचित जाती / नवबौध्द (एससी) | १३ |
| (२) | अनुसूचित जमाती (एसटी ) | ०७ |
| (३) | विमुक्त जाती (अ) (व्हीजे -ए) (१४ व इतर) | ०३ |
| (४) | भटक्या जमाती (ब) (एन्टी-बी) (१९९० पूर्वीच्या सूचीप्रमाणे २८ व इतर) | २.५ |
| (५) | भटक्या जमाती (क) (एन्टी - सी ) | ३.५ |
| (६) | भटकया जमाती (ड) (एन्टी - डी) | ०२ |
| (७) | इतर मागास वर्गीय (ओबीसी) विशेष मागास प्रवर्गातील जातींना इतर मागास प्रवर्ग म्हणून समजले जाईल | १९ |
| | एकूण | ५० |

वर नमूद केलेल्या आरक्षणाव्यतिरिक्त प्रवेश प्रक्रियेसाठी लागू असलेले विशेष आरक्षण पुढीलप्रमाणे आहे.

(ब) विशेष आरक्षण

| अ.क्र. | संवर्ग | टक्केवारी |
|---|---|---|
| (१) | स्वातंत्र्य सैनिकाचे पाल्य (एफएफ) | २ |
| (२) | अपंग<br>अ) अंधत्व किंवा क्षीणदृष्टी (blindness or low vision)<br>ब) श्रवण शक्तीतील दोष (hearing impairment)<br>क) चलनवलन विषयक विकलांगता किंवा मेंदूचा अर्धांगवायू (locomotor disability or cerebral palsy) | ३ |
| (३) | आजी व माजी सैनिकांची मुले (डीपी) | २ |

२५१५

| अ.क्र. | संवर्ग | टक्केवारी |
|---|---|---|
| (४) | महाराष्ट्र प्रकल्प बाधितांचे पुनर्वसन अधिनियम, १९९९ अन्वये प्रकल्यामुळे विस्थापित झालेल्या व्यक्तींची मुले प्रकल्पबाधित. (पीएपी) | ४ |
| (५) | शेतकरी व विहित किमान अर्हता असलेले किंवा कृषीविषयक अनुभव असलेली शेतक-यांची मुले. (ॲजी) | ६ |
| (६) | महिला | ३० |

खुल्या असलेल्या जागा व सामाजिक आरक्षित संवर्गामध्ये विशेष आरक्षण गुणवत्तेनुसार समाविष्ट राहतील.

सामाजिक आरक्षण व विशेष आरक्षण निर्धारित व्हावे आणि सर्वांना समान न्याय मिळावा, या दृष्टिकोनातून **परिशिष्ट-१** येथे विशद करण्यात आल्याप्रमाणे सामाजिक आरक्षणाच्या वाटपाची कार्यपध्दती अवलंबिण्यात यावी. तसेच **परिशिष्ट-२** येथे विशद करण्यात आल्याप्रमाणे प्रवेश कार्यपध्दती अवलंबिण्यात यावी.

महाराष्ट्र कृषी विद्यापीठे अधिनियम, १९८३ च्या कलम १२ (३) (डी) मधील तरतुदीनुसार राज्यातील कृषी विद्यापीठांतर्गत पदवी, पदव्युत्तर व आचार्य पदवी अभ्यासक्रमाच्या घटक, अनुदानित व कायम विना अनुदानित महाविद्यालयांना परवानगी देण्याचे (to grant permission) आणि सदर महाविद्यालयांमध्ये केंद्रीय पध्दतीने प्रवेश प्रक्रिया राबविण्याचे / विहित करण्याचे तसेच प्रवेशासाठी गुणाधिभार / अतिरिक्त गुण (Weightages) देण्याबाबतचे धोरण निश्चित करण्याचे आणि कृषी विद्यापीठांतर्गत सर्व प्रकारच्या कृषी अभ्यासक्रमांचे प्रवेश, शैक्षणिक व इतर शुल्क निश्चित करण्याचे अधिकार महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, पुणे यांना प्रदान करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(डॉ. सुधीर कुमार गोयल)
प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

(१) मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई.
(२) मा.मुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
(३) मा. उपमुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
(४) मा. मंत्री (कृषी) / मा. राज्यमंत्री (कृषी) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
(५) महासंचालक, महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, भांबुर्डा, भोसलेनगर, पुणे.
(६) मा.कुलगुरु / कुलसचिव / नियंत्रक, डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली
(७) मा.कुलगुरु / कुलसचिव / नियंत्रक, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी
(८) मा.कुलगुरु / कुलसचिव / नियंत्रक, डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला
(९) मा.कुलगुरु / कुलसचिव / नियंत्रक, मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी
(१०) आयुक्त (कृषी), महाराष्ट्र राज्य, पुणे
(११) आयुक्त (पशुसंवर्धन), महाराष्ट्र राज्य, पुणे
(१२) आयुक्त (मत्स्यव्यवसाय), महाराष्ट्र राज्य, मुंबई
(१३) आयुक्त (दुग्धविकास), महाराष्ट्र राज्य, मुंबई
(१४) सर्व विभागीय आयुक्त.

(१५) सर्व जिल्हाधिकारी,
(१६) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,
(१७) महालेखापाल, १ / २, महाराष्ट्र राज्य, मुंबई / नागपूर
(१८) मुख्य लेखा परीक्षण अधिकारी, स्थानिक निधी लेखा, कोकण भवन, मुंबई
(१९) सर्व मंत्रालयीन विभाग,
(२०) सर्व उपसचिव / अवर सचिव / कार्यासन अधिकारी, कृषी व पदुम विभाग,
(२१) निवड नस्ती.

## परिशिष्ट - १

## सामाजिक आरक्षणाच्या वाटपाची कार्यपध्दती

१. चारही कृषी विद्यापीठांतर्गत पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमासंदर्भात भारतीय कृषी अनुसंधान परिषद, नवी दिल्ली आणि राज्याबाहेरील उमेदवारांकरिता राखीव असलेल्या जागा वगळून, तसेच आचार्य पदवी अभ्यासक्रमासंदर्भात राज्याबाहेरील उमेदवारांकरिता राखीव असलेल्या जागा वगळून, उर्वरित जागा 'महाराष्ट्र' व 'विद्यापीठ' कोटयातून भरण्यात याव्यात. 'महाराष्ट्र' व 'विद्यापीठ' कोटयातील जागांच्या प्रवेश प्रक्रियेकरिता दरवर्षी महाविद्यालय/केंद्रनिहाय सामाजिक व विशेष आरक्षणाचे वाटप करण्यात यावे.

२. ज्या सामाजिक प्रवर्गांना आरक्षणाची टक्केवारी कमी आहे, अशा प्रवर्गांना कमी प्रवेश क्षमता असलेल्या महाविद्यालय / केंद्रामध्ये वर्षानुवर्षे जागा उपलब्ध होत नाहीत. पर्यायाने असे उमेदवार या अभ्यासक्रमापासून वंचित राहतात. त्यामुळे भविष्यात सेवा भरती करतांना अशा प्रवर्गातील उमेदवारच उपलब्ध होणार नाहीत. तसेच कमी प्रवेश क्षमता आणि जागांची विषम संख्या असलेल्या महाविद्यालय / केंद्राच्या ठिकाणी प्रवेश क्षमतेच्या किमान ५० टक्के आरक्षण निर्धारित होत नाही. त्यासाठी ५० टक्के जागा सामाजिक मागास प्रवर्गांकरिता उपलब्ध करून, यापैकी ज्या सामाजिक मागास प्रवर्गांना त्यांच्या टक्केवारीनुसार जागा उपलब्ध होतात, त्यांच्यासाठी त्या जागा आरक्षित कराव्यात आणि ५० टक्क्यांपैकी काही जागा शिल्लक असल्यास, अशा जागा (सामाजिक मागास प्रवर्गाच्या टक्केवारीनुसार जागा उपलब्ध झालेला प्रवर्ग वगळून) ज्या सामाजिक मागास प्रवर्गांना कमी टक्केवारीमुळे जागा उपलब्ध होत नाहीत, अशा सामाजिक मागास प्रवर्गांना 'जादा टक्केवारीस प्रथम प्राधान्य' या तत्वावर क्रमवारीने (By Rotation) दरवर्षी उपलब्ध करून देण्यात याव्यात. उदा. अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती (क), भटक्या जमाती (ड), इतर मागासवर्ग या प्रवर्गांना जागा उपलब्ध होत नसल्यास, या प्रवर्गांना त्यांच्या टक्केवारीचे जादा प्रमाण विचारात घेऊन म्हणजेच इतर मागास वर्ग (१९ टक्के), अनुसूचित जाती (१३ टक्के), अनुसूचित जमाती (७ टक्के), भटक्या जमाती (क) (३.५ टक्के), विमुक्त जाती (अ) (३ टक्के), भटक्या जमाती (ब) (२.५ टक्के), भटक्या जमाती (ड) (२ टक्के) अशा क्रमवारीने दरवर्षी जागा उपलब्ध करून देण्यात याव्यात. प्रवेश क्षमता विषम संख्येत असल्यास वरील क्रमवारीनुसार अशा जागा गुणवत्तेनुसार सर्व उपलब्ध उमेदवारामधून त्या वर्षी भरण्यात याव्यात. यामुळे सर्व प्रवर्गांना न्याय्य मार्गाने जागा उपलब्ध करून देणे शक्य होईल. यासाठी पुढीलप्रमाणे उदाहरणासह स्पष्ट करण्यात आले आहे.

(१) १० प्रवेश क्षमता असलेल्या महाविद्यालय / केंद्राचे वाटप करण्यासाठी खालील कार्यपध्दती अनुसरावी लागेल.

| प्रवर्ग | आरक्षणाची टक्केवारी | टक्केवारी नुसार येणारी अपूर्णांकातील संख्या | टक्केवारीची संख्या पूर्णांकात करून वाटप करावयाच्या जागा |
|---|---|---|---|
| अनुसूचित जाती | १३ | १.३ | १ |
| अनुसूचित जमाती | ०७ | ०.७ | १ |
| विमुक्त जाती (अ) | ०३ | ०.३ | ० |
| भटक्या जमाती (ब) | २.५ | ०.३ | ० |
| भटक्या जमाती (क) | ३.५ | ०.४ | [illegible] |

| | | | |
|---|---|---|---|
| भटक्या जमाती (ड) | ०२ | ०.२ | ० |
| इतर मागासवर्गीय | १९ | १.९ | २ |
| उर्वरित जागा खुल्या प्रवर्गासाठी | | | ६ |

विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती (क) आणि भटक्या जमाती (ड) या प्रवर्गांना जागा उपलब्ध होत नाहीत. तसेच सामाजिक आरक्षणासाठी ४० टक्के व खुल्या प्रवर्गासाठी ६० टक्के जागा उपलब्ध होतात. त्यामुळे ५० टक्के आरक्षण निर्धारित होत नाही. ही बाब विचारात घेऊन एकूण जागांपैकी एक जागा विमुक्त जाती (अ) / भटक्या जमाती (ब) / भटक्या जमाती (क) / भटक्या जमाती (ड) या प्रवर्गांना 'जादा टक्केवारीस प्रथम प्राधान्य' या तत्वावर वाटप करण्यात यावी.

म्हणजेच पहिले वर्ष भटक्या जमाती (क) (३.५ टक्के),

दुसरे वर्ष विमुक्त जाती (अ) (३ टक्के),

तिसरे वर्ष भटक्या जमाती (ब) (२.५ टक्के) आणि

चौथे वर्ष भटक्या जमाती (ड) (२ टक्के) हा क्रम संपल्यानंतर-

पाचव्या वर्षापासून पुन्हा वरील क्रमाने जागा उपलब्ध करून देण्यात याव्यात.

(२) ७ प्रवेश क्षमता असलेल्या महाविद्यालय / केंद्राचे वाटप करण्यासाठी खालील कार्यपध्दती अनुसरावी लागेल.

| प्रवर्ग | आरक्षणाची टक्केवारी | टक्केवारी नुसार येणारी अपूर्णांकातील संख्या | टक्केवारीची संख्या पूर्णांकात करून वाटप करावयाच्या जागा |
|---|---|---|---|
| अनुसूचित जाती | १३ | ०.९१ | १ |
| अनुसूचित जमाती | ०७ | ०.४९ | ० |
| विमुक्त जाती (अ) | ०३ | ०.२१ | ० |
| भटक्या जमाती (ब) | २.५ | ०.१८ | ० |
| भटक्या जमाती (क) | ३.५ | ०.२५ | ० |
| भटक्या जमाती (ड) | ०२ | ०.१४ | ० |
| इतर मागासवर्गीय | १९ | १.३३ | १ |
| उर्वरित जागा खुल्या प्रवर्गासाठी | | | ५ |

अनुसूचित जमाती, विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती (क) आणि
भटक्या जमाती (ड) या प्रवर्गांना जागा उपलब्ध होत नाहीत. ५० टक्के आरक्षण विचारात घेता एकूण
जागांचा विचार करता आरक्षित प्रवर्गांना ३.५ आणि खुल्या प्रवर्गास ३.५ जागा उपलब्ध होणे आवश्य
आहे. अशाप्रकरणी प्रथम वर्षी ४ जागा खुल्या प्रवर्गासाठी आणि ३ जागा आरक्षित प्रवर्गासाठी वा
करण्यात याव्यात. आरक्षित प्रवर्गामध्ये इतर मागासप्रवर्ग व अनुसूचित जाती या प्रवर्गां

टक्केवारीनुसार प्रत्येकी एक जागेचे वाटप होत असल्याने उर्वरित तिसरी जागा 'जादा टक्केवारीस प्रथम प्राधान्य' या तत्वावर अनुसूचित जमाती (७ टक्के) या प्रवर्गास वाटप करण्यात यावी.

दुस-या वर्षी ३ जागा खुल्या पध्दतीने वाटप करण्यात येऊन ४ जागा आरक्षित प्रवर्गासाठी वाटप करण्यात याव्यात. आरक्षित प्रवर्गामध्ये इतर मागासप्रवर्ग व अनुसूचित जाती या प्रवर्गांना टक्केवारीनुसार प्रत्येकी एक जागेचे वाटप करण्यात यावे. अनुसूचित जमाती (७ टक्के) या प्रवर्गास पहिल्या वर्षी लाभ देण्यात आलेला असल्याने उर्वरित दोन जागा 'जादा टक्केवारीस प्रथम प्राधान्य' या तत्वावर अनुसूचित जमाती (७ टक्के) वगळता भटक्या जमाती (क) (३.५ टक्के) व विमुक्त जाती (अ) (३ टक्के) यांना प्रत्येकी एक याप्रमाणे वाटप करण्यात यावे.

तिस-या वर्षी खुल्या ३ जागा वाटप करण्यात येऊन ४ जागा आरक्षित प्रवर्गासाठी वाटप करण्यात याव्यात. आरक्षित प्रवर्गामध्ये इतर मागासप्रवर्ग व अनुसूचित जाती या प्रवर्गांना टक्केवारीनुसार प्रत्येकी एक जागेचे वाटप करण्यात यावे. अनुसूचित जमाती (७ टक्के) या प्रवर्गास पहिल्या वर्षी लाभ देण्यात आलेला आहे. भटक्या जमाती (क) (३.५ टक्के) व विमुक्त जाती (अ) (३ टक्के) या प्रवर्गांना दुस-या वर्षी लाभ देण्यात आलेला आहे. त्यामुळे उर्वरित दोन जागा भटक्या जमाती (ब) (२.५ टक्के) आणि भटक्या जमाती (ड) (२ टक्के) या प्रवर्गांना प्रत्येकी एक याप्रमाणे वाटप करण्यात यावे.

चौथ्या वर्षापासून पुन्हा वरील दरवर्षीच्याच क्रमाने जागांचे वाटप करण्यात यावे.

(३) ५ प्रवेश क्षमता असलेल्या महाविद्यालय / केंद्राचे वाटप करण्यासाठी खालील कार्यपध्दती अनुसरावी लागेल.

| प्रवर्ग | आरक्षणाची टक्केवारी | टक्केवारी नुसार येणारी अपूर्णांकातील संख्या | टक्केवारीची संख्या पूर्णांकात करून वाटप करावयाच्या जागा |
|---|---|---|---|
| अनुसूचित जाती | १३ | ०.७ | १ |
| अनुसूचित जमाती | ०७ | ०.४ | ० |
| विमुक्त जाती (अ) | ०३ | ०.२ | ० |
| भटक्या जमाती (ब) | २.५ | ०.१ | ० |
| भटक्या जमाती (क) | ३.५ | ०.२ | ० |
| भटक्या जमाती (ड) | ०२ | ०.१ | ० |
| इतर मागासवर्गीय | १९ | १ | १ |
| उर्वरित जागा खुल्या प्रवर्गासाठी | | | ३ |

अनुसूचित जमाती, विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती (क) आणि भटक्या जमाती (ड) या प्रवर्गांना जागा उपलब्ध होत नाहीत. याचबरोबर ५० टक्के आरक्षण निर्धारित होत नाही. ही बाब विचारात घेऊन एकूण जागांपैकी एक जागा अनुसूचित जमाती, विमुक्त जाती (अ),

भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती (क) आणि भटक्या जमाती (ड) या प्रवर्गांना 'जादा टक्केवारीस प्रथम प्राधान्य' या तत्वावर वाटप करण्यात यावी. म्हणजेच

पहिले वर्ष अनुसूचित जमाती (७ टक्के),

दुसरे वर्ष भटक्या जमाती (क) (३.५ टक्के),

तिसरे वर्ष विमुक्त जाती (अ) (३ टक्के),

चौथे वर्ष भटक्या जमाती (ब) (२.५ टक्के),

पाचवे वर्ष भटक्या जमाती (ड) (२ टक्के) हा क्रम संपल्यानंतर सदर जागा सहाव्या वर्षी खुल्या पध्दतीने उपलब्ध करुन सातव्या वर्षापासून पुन्हा वरील क्रमाने जागा उपलब्ध करुन देण्यात याव्यात.

(४) ३ प्रवेश क्षमता असलेल्या महाविद्यालय / केंद्राचे वाटप करण्यासाठी खालील कार्यपध्दती अनुसरावी लागेल.

| प्रवर्ग | आरक्षणाची टक्केवारी | टक्केवारी नुसार येणारी अपूर्णांकातील संख्या | टक्केवारीची संख्या पूर्णांकात करुन वाटप करावयाच्या जागा |
|---|---|---|---|
| अनुसूचित जाती | १३ | ०.३९ | ० |
| अनुसूचित जमाती | ०७ | ०.२१ | ० |
| विमुक्त जाती (अ) | ०३ | ०.०९ | ० |
| भटक्या जमाती (ब) | २.५ | ०.७५ | ० |
| भटक्या जमाती (क) | ३.५ | ०.११ | ० |
| भटक्या जमाती (ड) | ०२ | ०.०६ | ० |
| इतर मागासवर्गीय | १९ | ०.५७ | १ |
| उर्वरित जागा खुल्या प्रवर्गासाठी | | | २ |

अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती (क) आणि भटक्या जमाती (ड) या प्रवर्गांना जागा उपलब्ध होत नाहीत. याचबरोबर ५० टक्के आरक्षण निर्धारित होत नाही. ५० टक्के आरक्षण विचारात घेता आरक्षित प्रवर्गांना १.५ आणि खुल्या प्रवर्गास १.५ जागा उपलब्ध होणे आवश्यक आहे. अशाप्रकरणी दरवर्षी १ जागा खुली व एक जागा इतर मागासप्रवर्गास वाटप करण्यात यावी. उर्वरित तिसरी जागा 'जादा टक्केवारीस प्रथम प्राधान्य' या तत्वावर

पहिल्या वर्षी खुली (म्हणजेच दोन जागा),

दुस-या वर्षी अनुसूचित जाती (१३ टक्के),

तिस-या वर्षी अनुसूचित जमाती (७ टक्के),

चौथ्या वर्षी भटक्या जमाती (क) (३.५ टक्के),

पाचव्या वर्षी विमुक्त जाती (अ) (३ टक्के),

२६३|१

सहाव्या वर्षी भटक्या जमाती (ब) (२.५ टक्के),

सातव्या वर्षी भटक्या जमाती (ड) (२ टक्के) अशा जागा उपलब्ध करून देण्यात याव्यात.

आठव्या वर्षी तिसरी जागा पुन्हा खुली ठेवून उक्त क्रम चालू ठेवावा.

टीप : उपरोक्त चारही उदाहरणे केवळ १ ते १० या अंकामधील सम व विषय संख्यांनाच लागू नसून त्यापुढील सर्व सम व विषम संख्यांबाबतदेखील लागू आहेत.

३. उपरोक्त विशद केलेल्या प्रवेशपध्दतीनुसार जागा वाटपाच्या क्रमवारीची कायमस्वरूपी नोंद असण्याकरिता चारही कृषी विद्यापीठांनी कुलसचिव यांच्या स्तरावर सोबत जोडलेल्या प्रपत्र 'अ', 'ब' आणि 'क' मधील नमुन्यात अनुक्रमे पदवी, पदव्युत्तर आणि आचार्य पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशितांसंबंधीची नोंदवही ठेवावी. तसेच चारही कृषी विद्यापीठांतर्गत वरील क्रमवारीची एकत्रित नोंदवही कृषी परिषद कार्यालयात ठेवण्यात यावी.



एच-२१९५[ ५००-१०-११]-५

२२९।

## परिशिष्ट २

## प्रवेश कार्यपध्दती

राज्यातील चारही कृषी विद्यापीठांतर्गत पदवी, पदव्युत्तर आणि आचार्य पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशांतर्गत सामाजिक आरक्षणाचा लाभ देण्याचा प्राधान्यक्रम व रिक्त जागांच्या रूपांतरणाची कार्यपध्दती खालीलप्रमाणे विहित करण्यात यावी.

(१) महाराष्ट्र व विद्यापीठ कोटयातील जागांवर प्रवेश देण्यासाठी पुढील क्रम अवलंबिण्यात यावा:-

(i) 'महाराष्ट्र' कोटयातील खुल्या जागांतर्गत सामाजिक प्रवर्गनिहाय.

(ii) 'विद्यापीठ' कोटयातील खुल्या जागांतर्गत सामाजिक प्रवर्गनिहाय.

(iii) 'महाराष्ट्र' कोटयातील खुल्या जागा (Open to all as per merit).

(iv) 'विद्यापीठ' कोटयातील खुल्या जागा.

(v) 'महाराष्ट्र' कोटयातील सामाजिक आरक्षणांतर्गत विशेष प्रवर्ग.

(vi) 'विद्यापीठ' कोटयातील सामाजिक आरक्षणांतर्गत विशेष प्रवर्ग.

(vii) 'महाराष्ट्र' कोटयातील सामाजिक प्रवर्ग.

(viii) 'विद्यापीठ' कोटयातील सामाजिक प्रवर्ग.

(२) एकापेक्षा जास्त विशेष प्रवर्ग असलेल्या उमेदवारास विशेष प्रवर्गाचा लाभ देण्याचा प्राधान्यक्रम संबंधित कोटयामधून (महाराष्ट्र / विद्यापीठ कोटा) खालीलप्रमाणे असावा.

(अ) स्वातंत्र्य सैनिकाचे पाल्य (एफ्एफ्).

(ब) अपंग

१) अंधत्व किंवा क्षीणदृष्टी (blindness or low vision)

२) श्रवण शक्तीतील दोष (hearing impairment)

३) चलनवलन विषयक विकलांगता किंवा मेंदूचा अर्धांगवायू (locomotor disability or cerebral palsy)) (पीएच्).

(क) आजी व माजी सैनिकांची मुले (डीपी).

(ड) महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम, १९९९ मधील तरतुदींप्रमाणे प्रकल्पामुळे विस्थापित झालेल्या व्यक्तींची मुले (पीओपी).

(इ) शेतकरी व विहित किमान अर्हता असलेले किंवा कृषीविषयक अनुभव असलेली शेतक-यांची मुले (अेजी).

(३) संबंधित प्रवर्गाचा उमेदवार उपलब्ध नसल्यास, रिक्त असलेल्या जागा खालील टप्प्यानुसार इतर प्रवर्गास रूपांतरित करण्यात याव्यात.

(अ) संबंधित प्रवर्गातील महिला उमेदवार उपलब्ध नसल्यास, अशा महिलांसाठी राखीव असलेल्यांपैकी रिक्त जागा, संबंधित कोटयामधून (महाराष्ट्र / विद्यापीठ कोटा) त्या त्या प्रवर्गातील पुरुष उमेदवारांसाठी रूपांतरित करण्यात याव्यात.

(ब) राज्याबाहेरील उमेदवारांसाठी राखीव असलेल्या जागा रिक्त राहिल्यास-

(१) अशा रिक्त जागांची 'महाराष्ट्र' व 'विद्यापीठ' कोटयामध्ये विभागणी करण्यात यावी.

(i) पदवी अभ्यासक्रमासंदर्भात अशी विभागणी रिक्त जागांच्या ३० टक्के जागा 'महाराष्ट्र' कोटा आणि रिक्त जागांच्या ७० टक्के जागा संबंधित 'विद्यापीठ' कोटा अशी असावी.

(ii) पदव्युत्तर व आचार्य पदवी अभ्यासक्रमासंदर्भात रिक्त जागांच्या ५० टक्के जागा 'महाराष्ट्र' कोटा आणि रिक्त जागांच्या ५० टक्के जागा संबंधित 'विद्यापीठ' कोटा अशी विभागणी करावी.

(२) या रिक्त जागांचे संबंधित कोटयामध्ये सामाजिक व विशेष आरक्षणाच्या टक्केवारीनुसार वाटप करावे.

(क) खुल्या जागांतर्गत / संबंधित सामाजिक प्रवर्गांतर्गत विशेष प्रवर्गाचे उमेदवार उपलब्ध नसल्यास, अशा विशेष आरक्षित जागा संबंधित कोटयामधून (महाराष्ट्र / विद्यापीठ कोटा) खुल्या जागांतर्गत / संबंधित सामाजिक प्रवर्गासाठी खालील प्रमाणे रूपांतरित करण्यात याव्यात.

(१) 'महाराष्ट्र' कोटयातील खुल्या जागांतर्गत विशेष प्रवर्गाचे उमेदवार उपलब्ध नसल्यास, अशा विशेष आरक्षित जागा 'महाराष्ट्र' कोटयातील सर्व पात्र उमेदवारांमधून गुणवत्तानुक्रमाने भरण्यात याव्यात.

(२) 'महाराष्ट्र' कोटयातील सामाजिक प्रवर्गांतर्गत विशेष प्रवर्गाचे उमेदवार उपलब्ध नसल्यास, अशा विशेष आरक्षित जागा 'महाराष्ट्र' कोटयामधून सामाजिक प्रवर्गासाठी रूपांतरित करण्यात याव्यात.

(३) 'विद्यापीठ' कोटयातील खुल्या प्रवर्गांतर्गत विशेष प्रवर्गाचे उमेदवार उपलब्ध नसल्यास, अशा विशेष आरक्षित जागा 'विद्यापीठ' कोटयातील सर्व पात्र उमेदवारांमधून गुणवत्तानुक्रमाने भरण्यात याव्यात.

(४) विद्यापीठ कोटयातील सामाजिक प्रवर्गांतर्गत विशेष प्रवर्गाचे उमेदवार उपलब्ध नसल्यास, अशा विशेष आरक्षित जागा विद्यापीठ कोटयामधून सामाजिक प्रवर्गासाठी रूपांतरित करण्यात याव्यात.

(ड) (१) सामाजिक आरक्षणांतर्गत संबंधित सामाजिक प्रवर्गातील उमेदवार उपलब्ध नसल्यास, शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, क्र.टीईएम ३३९७/१२९२६/(९०८६) /तांशि-१, दि.११/७/१९९७ नुसार, संबंधित महाविद्यालयाच्या / केंद्राच्या एकूण प्रवेश क्षमतेच्या जास्तीत जास्त २ टक्क्यांपर्यंतच्या जागा 'विशेष मागास प्रवर्गां'च्या उमेदवारांसाठी प्रथम उपलब्ध करून देण्यात याव्यात.

(२) विशेष मागासप्रवर्गातील उमेदवार प्रवेशासाठी उपलब्ध नसल्यास, 'विद्यापीठ' कोटयातील सामाजिक आरक्षित जागा संबंधित सामाजिक प्रवर्गासाठी 'महाराष्ट्र' कोटयामध्ये रूपांतरित करण्यात याव्यात.

(इ) (१) २ टक्क्यांपर्यंतच्या जागांवर प्रवेश दिल्यानंतर सामाजिक प्रवर्गांमध्ये जागा रिक्त असल्यास, त्या जागांची संबंधित कोटयामध्ये (महाराष्ट्र / विद्यापीठ कोटा) सरमिसळ करून इतर सर्व सामाजिक आरक्षणांतर्गत मागासवर्गीय उमेदवारांना रिक्त जागा उपलब्ध करून देण्यात याव्यात.

(इ) 'विद्यापीठ' कोटयातील सामाजिक प्रवर्गासाठी राखीव असलेल्या जागांवर उमेदवार उपलब्ध नसल्यास, अशा रिक्त जागा 'महाराष्ट्र' कोटयातील सामाजिक प्रवर्गातील उमेदवारांसाठी उपलब्ध करून देण्यात याव्यात.

(ऊ) शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, क्र.टीईएम ३३९७/१२९२६/ (९०८६) /तांशि-१, दि.११/७/१९९७ नुसार जागांची सरमिसळ करण्यात आलेली असल्याने, अशा रिक्त जागा कोणत्या प्रवर्गाच्या आहेत हे निश्चित करता येत नाही. त्यामुळे अशा रिक्त जागा सामाजिक व विशेष आरक्षणाच्या टक्केवारीप्रमाणे 'महाराष्ट्र' कोटयाद्वारे उपलब्ध करून देण्यात याव्यात.

(फ) 'महाराष्ट्र' कोटयातील सामाजिक प्रवर्गासाठी राखीव असलेल्या जागांवर उमेदवार उपलब्ध नसल्यास, अशा रिक्त जागा 'महाराष्ट्र' कोटयातील सर्व पात्र उमेदवारांमधून गुणवत्तानुक्रमाने भरण्यात याव्यात.

(ग) 'महाराष्ट्र' कोटयामध्ये कोणताही उमेदवार उपलब्ध नसल्यास, अशा रिक्त जागा राज्याबाहेरील उमेदवारांसाठी उपलब्ध करून देण्यात याव्यात.

**<u>पदव्युत्तर व आचार्य पदवी अभ्यासक्रमातील विषयांचे वाटप :</u>**

पदव्युत्तर व आचार्य पदवी अभ्यासक्रमामध्ये विद्याशाखेबरोबरच विशिष्ट विषयास प्रवेश देण्यात येतात. भारतीय कृषी अनुसंधान परिषदेच्या कोटयाकरिता राखून ठेवण्यात आलेले विषय वगळून व राज्याबाहेरील उमेदवारांसाठी २ टक्के जागा सोडून उर्वरित जागांचे 'महाराष्ट्र' कोटा व 'विद्यापीठ' कोटा म्हणजेच ५०:५० प्रमाणे विषयांच्या जागांचे आरक्षण व वाटप खालीलप्रमाणे करण्यात यावे.

(१) खुला आणि सामाजिक आरक्षित प्रवर्गाकरिता ५०:५० याप्रमाणात संबंधित महाविद्यालय / केंद्रामध्ये 'सामान्य वर्ग' आणि 'आरक्षित वर्ग' अशा दोनप्रकारे विषयनिहाय वाटप करण्यात यावे. 'सामान्य वर्गा'मध्ये राज्याबाहेरील उमेदवारांसाठी राखून ठेवलेल्या २ टक्के जागा समाविष्ट असाव्यात.

(२) विषयाच्या जागा, विषम संख्येत असल्यास 'सामान्य वर्ग' आणि 'आरक्षित वर्गा'स प्रत्येक शैक्षणिक वर्षामध्ये आळीपाळीने सम व विषम प्रमाणात विषयांचे वाटप करण्यात यावे.

(३) 'सामान्य वर्गा'तील विषयांचे प्रवेश गुणवत्तेनुसार देण्यात यावेत.

(४) (i) पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या सर्व विद्याशाखांमधील केंद्रनिहाय व विषयनिहाय सामाजिक आरक्षण निश्चित करून वाटणी केल्यानंतर, सामाजिक आरक्षित प्रवर्गांना विषयांचे वाटप करण्यासाठी प्रत्येक विद्याशाखेकरिता केंद्रनिहाय व विषयनिहाय स्वतंत्र ५० बिंदू नामावलीचा वापर करावा.

(ii) सदर बिंदू नामावली पुढील शैक्षणिक वर्षामध्ये क्रमशः पुढे वापरण्यात यावी.

(५) पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या धर्तीवरच आचार्य पदवी अभ्यासक्रमाच्या प्रत्येक विद्याशाखेकरिता स्वतंत्र बिंदूनामावलीद्वारे विषयाचे वाटप करण्यात यावे.

---

## प्रपत्र 'अ'

### चारही कृषी विद्यापीठांनी कुलसचिव यांच्या स्तरावर पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी ठेवावयाच्या नोंदवहीचा नमुना

षी विद्यापीठाचे नाव:- ..................................................................................................

ाविद्यालयाचे नाव:- ..................................................................................................

| कूण प्रवेश क्षमता:- ............ | भारतीय कृषी अनुसंधान परिषदेच्या कोट्याकरिता ५ टक्के जागा .......... | राज्याबाहेरील उमेदवारासाठी २ टक्के जागा .......... |
|---|---|---|
| | 'महाराष्ट्र' कोटा : ........ जागा | 'विद्यापीठ' कोटा : .......... जागा |

| [illegible] | कोटा (M/U) | अनुसूचित जाती (१३%) | अनुसूचित जमाती (७%) | विमुक्त जाती (अ) (३%) | भटक्या जमाती (ब) (२.५ %) | भटक्या जमाती (क) (३.५ %) | भटक्या जमाती (ड) (२%) | इतर मागासवर्ग (१९%) | खुल्या जागा | शेरा | नोंद घेणाऱ्या अधिकाऱ्याची सही | पडताळणी करणाऱ्या अधिकाऱ्याची सही |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | |

प्रपत्र 'ब'

चारही कृषी विद्यापीठांनी कुलसचिव यांच्या स्तरावर पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी ठेवावयाच्या नोंदवहीचा नमुना

विद्यापीठाचे नावः- ..............................

...लय / केंद्राचे नावः- ..............................

| ...देश क्षमताः- .......... | भारतीय कृषी अनुसंधान परिषदेच्या कोटयांकरिता १५ टक्के जागा .......... | राज्याबाहेरील उमेदवारासाठी २ टक्के जागा .......... |
|---|---|---|
| | 'महाराष्ट्र' कोटा : .......... जागा | 'विद्यापीठ' कोटा : .......... जागा |

| ...क ... | कोटा (M/ U) | अनुसूचित जाती (१३%) | अनुसूचित जमाती (७%) | विमुक्त जाती (अ) (३%) | भटक्या जमाती (ब) (२.५ %) | भटक्या जमाती (क) (३.५ %) | भटक्या जमाती (ड) (२%) | इतर मागासवर्ग (१९%) | खुल्या जागा | शेरा | नोंद घेणाऱ्या अधिकाऱ्याची सही | पडताळणी करणाऱ्या अधिकाऱ्याची सही |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | |

२६

## प्रपत्र 'क'

चारही कृषी विद्यापीठांनी कुलसचिव यांच्या स्तरावर आचार्य पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी ठेवावयाच्या नोंदवहीचा नमुना

[illegible]षी विद्यापीठाचे नावः- ................................................................................

[illegible]त्राचे नावः- ................................................................................

| | |
|---|---|
| [illegible]कूण प्रवेश क्षमताः- ..........- | राज्याबाहेरील उमेदवारासाठी २ टक्के जागा .......... |
| [illegible]हाराष्ट्र' कोटा : ........ जागा | 'विद्यापीठ' कोटा : ........ जागा |

| [illegible]मांक [illegible]र्ग | कोटा (M/U) | अनुसूचित जाती (१३%) | अनुसूचित जमाती (७%) | विमुक्त जाती (अ) (३%) | भटक्या जमाती (ब) (२.५ %) | भटक्या जमाती (क) (३.५ %) | भटक्या जमाती (ड) (२%) | इतर मागासवर्ग (१९%) | खुल्या जागा | शेरा | नोंद घेणा-या अधिका-याची सही | पडताळणी करणा-या अधिका-याची सही |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | |

२६४/०

## परिशिष्ट ‘बी’

**भूमिहीन शेतमजूर असल्याबाबतच्या प्रमाणपत्राचा नमुना**

( हे प्रमाणपत्र नायब तहसिलदारापेक्षा कनिष्ठ दर्जाच्या अधिका-याच्या स्वाक्षरीचे नसावे)

प्रमाणित करण्यात येते की, श्री/श्रीमती ........................................... (विद्यार्थ्याच्या वडीलांचे / आईचे नांव) राहणार.......................... तालुका............................ जि. ............................... हे ....................................................... (विद्यार्थ्यांचे नांव) यांचे वडील/आई असून त्यांच्या नांवे कोणतीही शेतजमीन नाही. त्यांचे मुख्य उत्पन्नाचे साधन हे ......................................... (शेत मालकाचे नांव) राहणार.................... तालुका...................... जि. .................. यांच्या शेतामधील दैनंदिन मजुरी हेच आहे.

ठिकाण - स्वाक्षरी
दिनांक - नांव
कार्यालयीन मोहर पदनाम

.......................................................................................................................................

टीप- हे प्रमाणपत्र प्रवेश घेणा-या विद्यार्थ्याच्या नावे नसावे.

---

## परिशिष्ट ‘सी’

**शेतकरी असल्याबाबतच्या प्रमाणपत्राचा नमुना**

( हे प्रमाणपत्र नायब तहसिलदारापेक्षा कनिष्ठ अधिका-याच्या स्वाक्षरीचे नसावे)

प्रमाणित करण्यात येते की, श्री. /श्रीमती.................................................................. (जमीन धारकाचे नांव) राहणार................ तालुका................. जि. ....................... हे श्री./कु. .......................................................... (विद्यार्थ्याचे नाव) यांचे/हिचे वडील/ आई /आजोबा /आजी (वडिलांकडून) असून श्री/श्रीमती.............................................. यांच्या नांवे ........... हे. ..........आर इतकी शेतजमीन आहे. ही जमीन ......................................... अधिनियम,* १९........... चे कलम ............ मधील तरतुदीनुसार कमाल धारणेपेक्षा अधिक नाही. असेही प्रमाणित करण्यात येते की, त्यांचे उत्पन्नांचे मुख्य साधन त्यांच्या नांवे असलेल्या शेतजमिनीतून आहे.

ठिकाण - स्वाक्षरी
दिनांक - नांव
कार्यालयीन मोहर पदनाम

.......................................................................................................................................

**टीप** (१) * येथे संबंधित अधिनियमाचे पूर्ण नाव द्यावे.
(२) स्वाक्षरी व कार्यालयीन मोहर ही अधिकृत अधिका-याचीच असावी.
(३) ‘शेतकरी’ म्हणजे अशी व्यक्ती की, जिच्या नावे असलेली शेतजमीन संबंधित महसुली विभागाच्या जमीन अधिनियमानुसार कमाल धारणेपेक्षा अधिक नाही.
(४) विद्यार्थी स्वतः जमीन मालक असल्यास जमीनधारकाचे नांव त्याचेच राहील.

**‘परिशिष्ट डी ’**

**‘मूळ प्रतींविषयी स्वयं घोषणापत्र’**

| |
|---|
| अर्जदाराचा फोटो |

मी ....................................... श्री. ................................. यांचा मुलगा / मुलगी वय ........... वर्ष, आधार क्रमांक (असल्यास) .............. व्यवसाय ................ राहणार ................. याद्वारे घोषित करतो / करते की, मी संकेतस्थळावर अपलोड केलेल्या सर्व कागदपत्रांच्या मूळ प्रती खऱ्या आहेत. त्या खोटया असल्याचे आढळून आल्यास, भारतीय दंड संहिता आणि / किंवा संबंधित कायदयानुसार माझ्यावर खटला भरला जाईल व त्यानुसार मी शिक्षेस पात्र राहीन याची मला पूर्ण जाणीव आहे.

ठिकाण :- ...............    अर्जदाराची सही ......................

दिनांक :- ...............    अर्जदाराचे नावः.......................

## ‘ परिशिष्ट ई ’

## ' उमेदवारांसाठी महत्वाच्या सूचना'

(१) प्रवेश अर्ज भरण्यापूर्वी **maha-agriadmission.in** या संकेतस्थळावर **'Application Flow Chart'** या शिर्षाद्वारे दर्शविण्यात आलेल्या प्रवेश पध्दतीच्या टप्प्यांचे अवलोकन करावे.

(२) ऑनलाईन प्रवेश अर्ज भरतांना मूळ कागदपत्रांच्या आधारे उमेदवारांने योग्य माहिती प्रवेश अर्जात द्यावी. चुकीची माहिती दिल्यास अशा चुकीच्या माहितीच्या आधारे झालेले प्रवेशाचे वाटप फेटाळण्यात येईल.

(३) प्रवेश माहिती पुस्तिकेमधील मुद्दा क्र. १९ येथे नमूद करण्यात आलेल्या वेळापत्रकाचे नीट आकलन करावे.

(४) प्रवेश प्रक्रिया संपूर्णतः ‘ऑनलाईन’ असल्याने **http://www.dtemaharashtra.gov.in** किंवा **www.mcaer.org** किंवा **maha-agriadmission.in** या संकेतस्थळांवर उमेदवाराने प्रवेश अर्जाद्वारे वैयक्तिक व शैक्षणिक माहिती भरावी.

(५) संकेतस्थळावर प्रवेश अर्ज भरल्यानंतर स्वाक्षरी आणि आवश्यक त्या सर्व कागदपत्रांच्या मूळप्रती स्कॅन करून संकेतस्थळावर अपलोड कराव्यात. मे. केटीपीएल, पुणे यांच्या अधिृकत केंद्रांवर एक कागदपत्र स्कॅन करण्यासाठी रू.५/- शुल्क आकारण्यात येईल. अशा अधिकृत केंद्रांची यादी संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

(६) स्कॅन करून अपलोड केलेली कागदपत्रे वाचनीय असावीत. याची खातरजमा करूनच कागदपत्रे अपलोड करावीत. अपलोड केलेली कागदपत्रे वाचनीय नसल्यास ते ग्राह्य धरण्यात येणार नाहीत व त्याची जबाबदारी पूर्णतः उमेदवाराची असेल.

(७) उमेदवाराचे पासपोर्ट आकाराचे सध्याचे छायाचित्र स्कॅन करून संकेतस्थळावर अपलोड करावे.

(८) प्रवेश अर्जामधील माहिती योग्य असल्याची, त्याप्रमाणे मूळ कागदपत्रे अपलोड केल्याची व प्रवेश शुल्क भरल्याची खातरजमा झाल्यानंतरच प्रवेश अर्ज दाखल करण्याचे बटन दाबावे. एकवेळा दाखल झालेल्या प्रवेश अर्जामध्ये दुरस्त्या / सुधारणा करता येणार नाहीत. याची उमेदवाराने नोंद घ्यावी.

(९) (अ) अंतरिम गुणवत्ता यादी प्रसिध्द झाल्यानंतर आपले नाव, प्रवर्ग, गुण, अधिभार इत्यादी माहिती अचूक आहे, याची प्रत्येक उमेदवाराने संकेतस्थळाद्वारे खातरजमा करावी.

(ब) माहितीमध्ये काही त्रुटी निदर्शनास आल्यास, पुराव्यादाखल कागदपत्राचे स्कॅन करून अशा स्कॅन कागदपत्रांसह वेळापत्रकात दिलेल्या मुदतीमध्ये उमेदवाराने आपल्या ‘लॉग-इन आय्डी’ व ‘पासवर्ड’च्या आधारे त्रुटीची ऑन लाईन पूर्तता करावी.

(१०) (अ) वेळापत्रकात नमूद केलेल्या दिनांकास प्रसिध्द केलेल्या महाविद्यालयनिहाय 'प्रवेश यादी'चे अवलोकन करावे.

(ब) **‘वाटप यादी’मध्ये नाव असलेल्या उमेदवाराने आपल्या ‘लॉग-इन आयडी’द्वारे ‘तात्पुरते प्रवेश वाटपपत्र’ (Provisional Allotment Letter) प्राप्त करून घ्यावे.**

**(११)** ज्या उमेदवारास प्रवेशाचे वाटप झालेले आहे, अशा उमेदवाराने प्रवेश माहिती पुस्तिकेतील ‘मुद्दा क्र. ४.१३ प्रवेश वाटपाची कार्यपध्दती’ चे आकलन करून प्रवेश निश्चित करण्याविषयी निर्णय घ्यावा.

**(१२)** सर्व ऑनलाईन प्रवेश वाटप फेऱ्या संपल्यानंतर, प्रवेशाचे वाटप निश्चित झालेल्या उमेदवारांनी संबंधित महाविद्यालयात उपस्थित राहून मूळ कागदपत्रे व आवश्यक ते शुल्क भरण्यासाठी वेळापत्रकात कालावधी निश्चित करण्यात आला आहे. या कालावधीत उमेदवारांनी मूळ कागदपत्रे व आवश्यक ते शुल्क जमा करावे. **ज्या उमेदवारांना शासनाकडून शुल्काची प्रतिपूर्ती होते, अशा उमेदवारांनी शुल्क भरु नये.**

(१३) उमेदवार स्वतः उपचारार्थ रूग्णालयात दाखल असल्यास व त्यास विहित मुदतीत प्रवेशासाठी उपस्थित राहणे शक्य नसल्यास अशावेळी उमेदवाराच्या गैरहजेरीत त्यास प्रवेश मिळू शकतो. मात्र उमेदवाराने अशाप्रसंगी एखाद्या व्यक्तीस स्वतःच्या स्वाक्षरीने प्राधिकृत करणे आवश्यक आहे. प्राधिकृत केलेल्या व्यक्तीने प्राधिकार पत्रासोबत उमेदवाराचे तात्पुरते वाटपपत्र, उमेदवाराची सर्व मूळ कागदपत्रे, संबंधित रुग्णालयाचे प्रमाणपत्र आणि आवश्यक ते शुल्क सोबत आणावे. प्राधिकार पत्राचा विहित नमुना **परिशिष्ट ‘जी’** येथे देण्यात आला आहे. ही बाब, जागेवरील प्रवेश फेरीच्यावेळी उमेदवार रूग्णालयात दाखल झालेला असल्यास त्यासाठीही लागू असेल.

**(१४)** (अ) **प्रवेशाची नोंदणी केल्यानंतर प्रवेश रद्द करावयाचा असल्यास संबंधित महाविद्यालयाच्या सहयोगी अधिष्ठाता / प्राचार्य यांच्याकडे प्रवेश रद्द करण्याबाबत विनंती अर्ज सादर करावा.**

(ब) अशाप्रकरणी **प्रवेश माहिती पुस्तिकेतील मुद्दा क्र. ४.१८ नुसार आवश्यक ते शुल्क तसेच मूळ कागदपत्रे महाविद्यालयाकडे जमा केलेली असल्यास ती परत घ्यावीत.**

(१५) ज्या विद्यार्थ्यांना स्वेच्छेने मरणोत्तर अवयव दान करावयाचे आहेत. त्यांनी **परिशिष्ट ‘एल’** येथील ‘मरणोत्तर अवयवदान संमती अर्ज’ भरून महाविद्यालयाकडे द्यावा.

(१६) शासन परिपत्रक, कृषी व पदुम विभाग, क्र. संकीर्ण - १५१७ / प्र.क्र.१८५ / ६-अे, दि.५/६/२०१७ अनुसार ज्या उमेदवारांचे मतदार यादीमध्ये नाव नोंदविलेले नाही, अशा उमेदवारांनी मतदार यादीमध्ये नाव नोंदविण्याविषयी हमी पत्र व नमुना ६, ७, ८ व ८-अ व्यवस्थित भरून प्रवेश घेतेवेळी संबंधित महाविद्यालयाकडे जमा करावे.

## परिशिष्ट 'एफ'

**प्रवेश घेताना महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी त्यांना असणा-या स्वच्छताविषयक सवयी तसेच त्यांच्या घरी असणा-या स्वच्छता विषयक सुविधांची माहिती भरण्याचा नमुना**

| | | |
|---|---|---|
| १ | नाव | ........................................................................ |
| २ | कायम रहिवासाचा पत्ता | ........................................................................<br>........................................................................ |
| ३ | कुटुंबाची माहिती | कुटुंबातील सदस्यांची संख्या-<br>शौचालय वापर करणा-यांची संख्या- |
| ४ | शौचालयाची उपलब्धता | आहे ☐ नाही ☐<br>शौचालयाची उपलब्धता नसल्यास कारण-<br>........................................................................ |
| ५ | हात धुण्याची सवय | जेवणापूर्वी- आहे ☐ नाही ☐ |
| | | असल्यास- साबणाने ☐ पाण्याने ☐ इतर ☐ |
| | | शौचानंतर- आहे ☐ नाही ☐ |
| | | असल्यास- साबणाने ☐ पाण्याने ☐ इतर ☐ |
| ६ | वचननामा | शौचालयाची आवश्यकता व त्याचा सातत्याने वापर करण्याबाबतचे संस्थेने केलेले आवाहन मी वाचले व त्याबाबतचे महत्व मला मनापासून पटले आहे. मी याचे महत्व माझ्या घरातील सर्वांना समजावून सांगून **येत्या तीन महिन्यात** माझ्या घरी शौचालय बांधेन व सर्व जण त्याचा नियमित वापर करण्याचे वचन मी संस्थेस देत आहे. |

दिनांक :-

स्वाक्षरी-

## परिशिष्ट 'जी'

## प्राधिकार पत्र

मी खाली सही करणार श्री./श्रीमती. ................................ .......................... ......... ....... प्रवेश अर्ज क्र........................., पदवी प्रवेश प्रक्रिया २०१८-१९ अंतर्गत दि..................... ते दि. ................... या कालावधीतील ............... प्रवेश वाटप फेरीद्वारे मला तात्पुरते वाटप पत्र प्राप्त झाले आहे.

मी आपल्या निदर्शनास आणू इच्छितो की, मला दि. ..................... पासून ....................................................................................... (रूग्णालयाचे नाव व पत्ता) या रूग्णालयामध्ये उपचारार्थ दाखल करण्यात आले आहे आणि .............................. ..................................................... (महाविद्यालयाचे नाव व पत्ता) महाविद्यालयामध्ये सदर वाटप फेरीस उपस्थित राहण्यास मी शारीरिकदृष्टया सक्षम नाही.

यास्तव माझा / माझी ....................... (नाते) श्री. / श्रीमती ................. .................. .................. यांना वरील वाटप फेरीस उपस्थित राहण्याकरिता मी प्राधिकृत करीत आहे. त्यांनी माझ्या समक्ष खाली स्वाक्षरी केली आहे आणि त्यांच्याकडे त्यांचे छायाचित्र असलेले ओळखपत्रसुध्दा (photo identity) आहे.

आवश्यक वैद्यकीय प्रमाणपत्र, इतर कागदपत्रे व शुल्क मी त्यांच्याकडे सुपूर्द केलेले आहे.

परवानगी आणि विचार होण्यासाठी विनंती आहे.

**आपला,**

**नामनिर्देशित केलेल्या व्यक्तीची स्वाक्षरी व नाव**

**उमेदवाराची स्वाक्षरी व नाव**

प्रति,

सहयोगी अधिष्ठाता / प्राचार्य,

.....................................................
.....................................................
.....................................................

## <u>परिशिष्ट ‘एच’</u>

### <u>'प्रवेश प्रक्रियेसंदर्भात महाविद्यालयांचे प्राचार्य यांच्यासाठी महत्वाच्या सूचना'</u>

(१) वाटपपत्रावर नमूद केलेल्या अंतिम दिनांकापर्यंत उमेदवार तात्पुरते प्रवेश वाटप पत्र (Provisional Allotment Letter) घेऊन आल्यानंतर, ज्या धर्तीवर प्रवेशाचे वाटप झालेले आहे, (उदा. गुण, प्रवर्ग, कोटा इत्यादी) अशी सर्व कागदपत्रे तपासून ते बरोबर असल्याची खातरजमा झाल्यास संकेतस्थळावर तशी नोंद करावी व मूळ कागदपत्रे उमेदवारास परत करून उमेदवाराकडून सदर कागदपत्राच्या छायाप्रती ठेवून घ्याव्यात.

(२) याचबरोबर प्रवेश अर्जातील माहितीनुसार **इतरही कागदपत्रे तपासून** ती माहितीसुध्दा बरोबर असल्याची खातरजमा करावी. माहिती बरोबर नसल्यास त्रुटीविषयक माहितीची नोंद महाविद्यालयाच्या लॉगइन मध्ये करावी. त्यानुसार प्रवेश अर्जातील इतर माहिती सुधारीत करण्यात येईल.

(३) ज्या धर्तीवर प्रवेशाचे वाटप झालेले आहे, अशी कागदपत्रे, उमेदवार सादर करू न शकल्यास अशा उमेदवाराचा प्रवेश वाटप फेटाळण्यात (Reject) यावा आणि महाविद्यालयाच्या लॉग इनमध्ये प्रवेश वाटप फेटाळण्याचे कारण नमूद करावे.

(४) प्रवेशाची नोंदणी झाल्यानंतर विद्यार्थ्यास प्रवेश रद्द करावयाचा असल्यास प्रवेश माहिती पुस्तिकेतील मुद्दा क्र. ४.१८ येथे नमूद केलेल्या पध्दतीने कार्यपध्दती अवलंबावी आणि महाविद्यालयाच्या ‘लॉग इन’द्वारे नोंद करावी.

(५) उमेदवार स्वतः उपचारार्थ रूग्णालयात दाखल असल्यास व त्यास विहित मुदतीत प्रवेशासाठी उपस्थित राहणे शक्य नसल्यास अशावेळी उमेदवाराच्या गैरहजेरीत प्राधिकृत केलेल्या व्यक्तीने प्राधिकृत पत्रासोबत संबंधित रुग्णालयाचे प्रमाणपत्र, तात्पुरते वाटपपत्र, आवश्यक ती मूळ कागदपत्रे व योग्य ते शुल्क सादर केल्यास उमेदवारास त्याच्या गैरहजेरीत प्रवेश देण्यात यावा. ही बाब, जागेवरील प्रवेश फेरीच्यावेळी उमेदवार रूग्णालयात दाखल झालेला असल्यास त्यासाठीही लागू असेल.

(६) ज्या विद्यार्थ्याकडून स्वेच्छेने मरणोत्तर अवयव दानविषयक परिशिष्ट 'एल' येथील 'मरणोत्तर अवयवदान संमती अर्ज' प्राप्त होईल, अशा विद्यार्थ्यास महाविद्यालयाकडून देण्यात येणाऱ्या ओळखपत्रावर 'अवयवदाता' अशी नोंद करावी.

(७) ज्या उमेदवारांचे मतदार यादीमध्ये नाव नोंदविलेले नाही, अशा उमेदवारांचे मतदार यादीमध्ये नाव नोंदविण्याविषयी उमेदवाराकडून हमी पत्र व नमुना ६, ७, ८ व ८-अ व्यवस्थित भरून घेऊन शासन परिपत्रक, कृषी व पदुम विभाग, क्र. संकीर्ण-१५१७/प्र.क्र.१८५/६-अे, दि.५/६/२०१७ अनुसार कार्यवाही करावी.

(८) सर्व ऑनलाईन प्रवेश वाटप फेऱ्या संपल्यानंतर, प्रवेशाचे वाटप निश्चित झालेल्या उमेदवारांनी संबंधित महाविद्यालयात उपस्थित राहून मूळ कागदपत्रे व आवश्यक ते शुल्क भरण्यासाठी वेळापत्रकात कालावधी निश्चित करण्यात आला आहे. या कालावधीत उमेदवारांची मूळ कागदपत्रे, आवश्यक ते शैक्षणिक शुल्क जमा करून घ्यावे. तसेच जमा केलेल्या शुल्काची पावती उमेदवारास द्यावी. **उमेदवारांना शासनाकडून ज्या शुल्काची प्रतिपूर्ती होते, असे शुल्क उमेदवारांकडून घेण्यात येऊ नये.**

(९) प्रवेश फे-या सुरु झाल्यानंतर किमान पाच महिन्यांपर्यंत सर्व महाविद्यालयांनी लॉगइनद्वारे माहिती अद्ययावत करत रहावी.

(१०) अंतिम गुणवत्ता यादीतील, संबंधित अभ्यासक्रमास पात्र असलेल्या उमेदवारांकडून व्यवस्थापन कोटयातून प्रवेश मिळण्याबाबत प्राप्त झालेल्या अर्जाची गुणवत्ता यादी तयार करून अशा उमेदवारांना, प्रवेश माहिती पुस्तिकेतील मुद्दा क्र. १९ येथील वेळापत्रकामध्ये नमूद केलेल्या कालावधीत व्यवस्थापन कोटयातून गुणवत्तेनुसार प्रवेश द्यावेत व शेवटच्या दिवशी प्रवेश दिलेल्या उमेदवारांची माहिती महाविद्यालयाच्या लॉगइनद्वारे दाखल करावी.

# परिशिष्ट- आय / APPENDIX - I

शासन सेवेत सरळ सेवा भरतीसाठी समांतर आरक्षण (Horizontal Reservation) कार्यान्वित करण्यासाठी अनुसरावयाची कार्यपध्दती विहित करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन,
सामान्य प्रशासन विभाग,
परिपत्रक क्रमांक:एसआरव्ही-1097/प्र.क्र.31/98/16-अ,
मंत्रालय, मुंबई-400 032, दिनांक 16 मार्च, 1999.

वाचा: 1. शासन निर्णय, सा.प्र.वि. क्र.एसआरव्ही-1077/3576/1433/16-अ, दि.23.5.1978.
2. शासन निर्णय, सा.प्र.वि. क्र.एसईएम-1080/35/16-अ, दि.21.1.1980.
3. शासन परिपत्रक, सा.प्र.वि. क्र.आयपीई/आरटीए-1080/0/181/16-अ, दि.10.10.1980.
4. शासन निर्णय, सा.प्र.वि. क्र.एसआरव्ही-1094/1004/प्र.क्र.30/16-अ, दि.17.11.1994.
5. शासन निर्णय, सा.प्र.वि. क्र.बीसीसी-1094/प्र.क्र.68/94/16-ब, दि.12.8.1994.
6. शासन निर्णय, न.व.वि. क्र.ईक्यूआर-1094/प्र.क्र.768/भूपुक-1, दि.9.8.1995.
7. शासन निर्णय, म.व.बा.क.वि. क्र.संकीर्ण-1096/प्र.क्र.30/का.-2, दि.1.8.1997.
8. शासन निर्णय, सा.प्र.वि. क्र.बीसीसी-1097/प्र.क्र.2/97/16-ब, दि.6.8.1997.
9. शासन परिपत्रक, सा.प्र.वि. क्र.एसआरव्ही-1097/प्र.क्र.12/97/16-अ, दि.2.5.1998.
10. अनिल कुमार गुप्ता वि. उत्तर प्रदेश राज्य आणि इतर (जेटी-1995(5)एससी-505) या प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या न्याय निर्णयातील मार्गदर्शक तत्वे.

परिपत्रक :- शासनाने सेवेतील भरतीसाठी मागासवर्गीयांसाठी आरक्षण लागू केले आहे. हे आरक्षण सामाजिक आरक्षण (Social Reservation) असल्याने ते उभे आरक्षण (Vertical Reservation) आहे. त्याचप्रमाणे विशेष आरक्षण (Special Reservation) मागासवर्गीयांव्यतिरिक्त अन्य घटकांसाठी लागू केलेले आहे व ते समांतर किंवा आडवे आरक्षण (Horizontal Reservation) आहे. या संदर्भात मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने (अॅपलेट साईड) रिट याचिका क्रमांक:4067/1998 वरील निर्णयान्वये अनिलकुमार गुप्ता वि. उत्तर प्रदेश राज्य आणि इतर (जेटी-1995(5)एससी-505) या प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या न्याय निर्णयास अनुसरुन समांतर आरक्षणाबाबत मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्याचे आदेश दिले आहेत. त्यानुसार सेवेतील उभे आरक्षण व समांतर आरक्षणाच्या संदर्भात अनुसरावयाची कार्यपध्दती व त्या बाबतच्या मार्गदर्शक सूचना शासकीय/निमशासकीय सेवा, मंडळे/महामंडळे/नगरपालिका/महानगरपालिका/जिल्हापरिषदा/शासकीय अनुदान प्राप्त संस्था/विद्यापिठे/सहकारी संस्था व शासकीय उपक्रम इत्यादींना लागू करण्यात यावे.

2. सेवेतील नियुक्तीसाठी सामाजिक आरक्षण (उभे आरक्षण) खालीलप्रमाणे आहे :-

| | | |
|---|---|---|
| 1. अनुसूचित जाती | : | 13% |
| 2. अनुसूचित जमाती | : | 7% |
| 3. विमुक्त जाती (अ) | : | 3% |
| 4. भटक्या जमाती (ब) | : | 2.5% |
| 5. भटक्या जमाती (क) | : | 3.5% |
| 6. भटक्या जमाती (ड) | : | 2% |
| 7. विशेष मागास प्रवर्ग | : | 2% |
| 8. इतर मागास वर्ग | : | 19% |

वर नमूद केलेल्या आरक्षणाव्यतिरिक्त सेवेतील नियुक्त्यांसाठी लागू असलेले विशेष आरक्षण (समांतर आरक्षण) पुढीलप्रमाणे आहे :-

| | | |
|---|---|---|
| 1. माजी सैनिक | 15% | फक्त गट क आणि गट ड साठी |
| 2. प्रकल्पग्रस्त/भूकंपग्रस्त | 5% | फक्त गट क आणि गट ड साठी |
| 3. अपंग | 3% | गट अ आणि ब मधील कोही पदांसाठी तसेच गट क आणि गट ड साठी |
| 4. महिला | 30% | |

समांतर आरक्षण हे फक्त सरळ सेवा भरतीस लागू राहील. समांतर आरक्षण हे सामाजिक आरक्षणांतर्गत आरक्षण असल्याने त्यास सामाजिक आरक्षणावर वाढीव म्हणून गणण्यात येऊ नये.

4. सर्वोच्च न्यायालयाच्या न्याय निर्णयात उल्लेखिलेल्या प्रमाणे समांतर आरक्षण हे कप्पीकृत आरक्षण ( Compartmentalised Reservation ) आहे, म्हणून पदे भरण्यापूर्वी, पदे निश्चित करताना तसेच भरतीची जाहिरात देताना त्या जाहिरातीत केवळ सामाजिक आरक्षणाची पदसंख्याच नमूद न करता सामाजिक आरक्षणाच्या प्रत्येक प्रवर्गामध्ये (उभे आरक्षण जसे अ.जा., अ.ज., वि.ज.(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड) वि.मा.प्र., इ.मा.व. आणि खुला प्रवर्ग) विशेष आरक्षणानुसार येणा-या राखीव पदांची संख्या सुध्दा निर्देशित करावी.

5. सर्वोच्च न्यायालयाच्या न्याय निर्णयात/उल्लेखिलेल्या नुसार समांतर आरक्षणांतर्गत त्या त्या प्रवर्गासाठी विहित करण्यात आलेल्या टक्केवारीनुसार वाटा निश्चितपणे मिळावा यासाठी सरळसेवा भरती करताना खालील टप्पे विचारात घेण्यात यावेत :-

(अ) प्रथम टप्पा :- गुणवत्तेच्या निकषानुसार खुल्या प्रवर्गातील उमेदवारांची निवड यादी करावी, या यादीत, समांतर आरक्षणात असणा-यांची संख्या पर्याप्त असेल तर कोणताही प्रश्न उद्‌भवणार नाही आणि त्यानुसार पदे भरावीत. जर समांतर आरक्षणाच्या प्रवर्गातील उमेदवारांची संख्या पर्याप्त नसेल तर समांतर आरक्षणाकरीता त्या त्या प्रवर्गातील उमेदवारांना उपलब्धतेनुसार पर्याप्त संख्येत यादीतील शेवटचे उमेदवार वगळून समाविष्ट करावेत.

(ब) दुसरा टप्पा :- त्यानंतर प्रत्येक सामाजिक आरक्षणाच्या प्रवर्गातील उमेदवारांच्या निवड याद्या तयार कराव्यात (जे उमेदवार यापूर्वीच टप्पा 'अ' मध्ये सामिल झाले असतील त्यांना या यादीतून वगळावे.)

(क) तिसरा टप्पा :- वरील 'ब' नुसार तयार करण्यात आलेल्या याद्यांमध्ये सामाजिक आरक्षणातील (Social Reservation ) प्रत्येक प्रवर्गाच्या विहित टक्केवारीनुसार 'अ' येथे विशद केलेल्या कार्यपध्दतीनुसार समांतर आरक्षणाचे पुरेसे उमेदवार समाविष्ट करावेत. मात्र असे करताना सामाजिक प्रवर्गांतर्गत राहावे.

6. सर्वोच्च न्यायालयाच्या न्याय निर्णयात उल्लेखिलेल्यानुसार विशेष आरक्षण हे प्रत्येक उभ्या आरक्षणाच्या कक्षांतर्गत राहील. म्हणजेच विशेष आरक्षण हे एका सामाजिक आरक्षण प्रवर्गातून दुस-या सामाजिक आरक्षण प्रवर्गात स्थानांतरीत करता येणार नाही.

7. सर्व नियुक्ती प्राधिका-यांनी वरील कार्यपध्दती तसेच सूचनांनुसार यापुढे न चुकता कार्यवाही करावी. हे आदेश शासकीय/निमशासकीय सेवा, मंडळे/महामंडळे/नगरपालिका/महानगरपालिका/जिल्हापरिषदा/शासकीय अनुदान प्राप्त संस्था/विद्यापिठे/सहकारी संस्था व शासकीय उपक्रम इत्यादींना लागू करण्यात यावेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

भि.रा.वाढवे,
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

राज्यपालांचे सचिव,
मुख्य मंत्री यांचे सचिव,
उप मुख्य मंत्री यांचे सचिव,
सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
मुख्य सचिव/अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
* प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ शाखा, मुंबई,
* प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई,
* प्रबंधक, मुंबई उच्च न्यायालय, मूळ शाखा, खंडपीठ, औरंगाबाद,
* प्रबंधक, मुंबई उच्च न्यायालय, अपील शाखा, खंडपीठ, औरंगाबाद,
* प्रबंधक, लोकआयुक्त आणि उप लोकआयुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
* सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
सचिव, महाराष्ट्र दुय्यम सेवा निवड मंडळ, मुंबई,
सचिव, सर्व प्रादेशिक दुय्यम सेवा निवड मंडळे,
संचालक, समाजकल्याण, पुणे,
सर्व मंत्रालयीन विभागांच्या अधिपत्याखालील विभागप्रमुख व कार्यालय प्रमुख,
सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,
निवड नस्ती.

* पत्राने.

एप-1445(5000-3-99)-अ.

## परिशिष्ट 'जे'

**Name of Institute / College : ____________________________________________**

**Undertaking from the students as per the provisions of anti-ragging**
**Verdict by the Hon'ble Supreme Court**

I, Mr./Ms. ________________________________________ SR/Roll No.__________ Course ______________ Degree programme ____________________ student of _______________________________ (college name) on this day ___________ month ______________ year _________ do hereby state on solemn affirmation and undertake that-

(1) I have read and understood the directives of the Hon'ble Supreme Court of India on anti-ragging and the measures proposed to be taken in the above reference (available at http://www.hbti.ac.in); and

(2) That I understand the meaning of 'ragging' and know that the ragging in any form is a punishable offence and the same is banned by the Court of Law.

(3) I have not been found or charged for my involvement in any kind of ragging in past. However, I undertake to face disciplinary action/legal proceedings including expulsion from the Institute if the above statement is found to be untrue or the facts are concealed, at any stage in future; and

**(4) I shall not resort to ragging in any form at any place and shall abide by the rules/laws prescribed by the Courts, Government of India and the Institute authorities for the purpose from time to time.**

**Date:** **Signature of Student**

I hereby fully endorse the undertaking made by my child/ward.

**Signature of Mother/Father and or Guardian**

**Witness:**

## परिशिष्ट 'के'

# जागेवर प्रवेश फेरीची (**Spot Admission**) कार्यपध्दती

जागेवरील प्रवेश फेरीपूर्वी राबविण्यात आलेल्या प्रवेश फे-यांद्वारे प्रवेश मिळालेल्या उमेदवारांनी नोंदणी न केल्याने अथवा इतर कारणाने जागा रिक्त असल्यास अशा रिक्त जागांसाठी दि. १९ ते २२ ऑगस्ट,२०१८ या कालावधीत संबंधित महाविद्यालयस्तरावर खालील कार्यपध्दतीने जागेवर प्रवेश फेरी (**Spot Admission Round**) राबविण्यात येईल.

यापूर्वी राबविण्यात आलेल्या प्रत्येक प्रवेश फेरीतील अंतिम गुणवत्ताविषयक प्रवर्गनिहाय (Categorywise Last Merit) तपशील व अद्ययावत रिक्त जागांचा प्रवर्गनिहाय तपशील संकेतस्थळावर १७ ऑगस्ट,२०१८ रोजी प्रसिध्द करण्यात येईल.

**राज्यस्तरीय / विद्यापीठस्तरीय गुणवत्ता यादीत समाविष्ट असलेले आणि चालू शैक्षणिक वर्षाच्या पदवी प्रवेश प्रक्रियेद्वारे प्रवेशित नसलेले (not admitted) उमेदवार जागेवर प्रवेश फेरीकरिता पात्र असतील.** अशा पात्र उमेदवारांनी तसेच जागेवरील प्रवेश प्रक्रिया केंद्रांनी खालील बाबी विचारात घ्याव्यात.

(१) संकेतस्थळावरील रिक्त जागांचा तपशील विचारात घेऊन उमेदवारांना ज्या महाविद्यालयात प्रवेश घ्यावयाचा आहे, त्या महाविद्यालयात दि.१९ ते २२ ऑगस्ट,२०१८ **या कालावधीत सकाळी ९.०० ते ११.३० वाजेपर्यंत** आवश्यक ती सर्व मूळ कागदपत्रे व शुल्कासह उमेदवारांनी उपस्थित राहावे.

(२) संबंधित महाविद्यालयांनी सकाळी ९.०० ते ११.३० या वेळेत त्यांच्याकडे उपस्थित असलेल्या उमेदवारांची संगणकावर नोंद घ्यावी. यानंतर मे.केटीपीएल, पुणे यांच्याकडून अशा उपस्थित असलेल्या उमेदवारांची गुणवत्ता यादी तयार करून संबंधित महाविद्यालयास दोन तासाच्या कालावधीत म्हणजेच दुपारी १.३० पर्यंत पुरविण्यात येईल. प्रत्येक दिवसाची स्वतंत्र गुणवत्ता यादी असेल. ही गुणवत्ता यादी फक्त त्याच दिवसासाठी ग्राह्य असेल.

(३) वरीलप्रमाणे पात्र उमेदवारांचा गुणानुक्रमे विचार करून रिक्त जागांसाठी प्रवेश देण्यात यावेत. **आरक्षित प्रवर्गातील रिक्त जागांसाठी संबंधित प्रवर्गाच्या उमेदवारांनाच प्राधान्यक्रमाने प्रवेश देण्यात यावेत.** संबंधित आरक्षित प्रवर्गाचे उमेदवार उपलब्ध नसल्यास, शासन निर्णय, कृषी व पदुम विभाग, क्र.मकृवि-२०१०/प्र.क्र.१५५/७अे, दि.२०/१०/२०११ मधील परिशिष्ट २ येथील प्रवेश कार्यपध्दतीनुसार अशा रिक्त जागांवर 'जागेवर प्रवेश फेरीच्या' (Spot Admission Round) शेवटच्या दिवशी म्हणजेच दि.२२ **ऑगस्ट,२०१८ रोजी** उपस्थित असलेल्या इतर उमेदवारांना गुणानुक्रमाने प्रवेश देण्यात यावेत. सदर शासन निर्णय **परिशिष्ट-'अे'** येथे उपलब्ध करून देण्यात आलेला आहे. **मात्र कोणत्याही परिस्थितीत आरक्षित जागांवर प्रवेश मिळाला नाही, अशी तक्रार आरक्षित प्रवर्गाच्या उमेदवारांकडून कोणत्याही परिस्थितीत येणार नाही, याची दक्षता संबंधित महाविद्यालयांनी घ्यावी.**

(४) योग्य त्या उमेदवाराची प्रवेशासाठी निवड निश्चित झाल्यास त्याप्रमाणे **मे.कल्प टेक्नॉलॉजीज प्रा.लि., पुणे ('केटीपीएल'-KTPL) यांच्या संकेतस्थळावर नोंदणी करून 'लॉग इन'द्वारे महाविद्यालयांनी संबंधित उमेदवारास प्रवेश द्यावा.** यासाठी संकेतस्थळावर महाविद्यालयाच्या 'लॉग इन'मध्ये योग्य ती सुविधा उपलब्ध करून देण्याची जबाबदारी 'केटीपीएल' यांची असेल.

(५) जागेवर प्रवेश फेरीद्वारे प्रवेशाचे वाटप झालेल्या उमेदवारास संबंधित महाविद्यालयाकडून तात्पुरते 'प्रवेश वाटप पत्र' देण्यात येईल.

(६) प्राचार्यांनी, महाविद्यालयात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांची आवश्यक ती कागदपत्रे व नियमानुसार प्रथम सत्राच्या शुल्काची रक्कम प्राप्त करून घ्यावी. याबाबत उमेदवारास पावती द्यावी.

(७) जागेवरील प्रवेश फेरीच्या कालावधीमध्ये उमेदवाराने प्रवेश रद्द केला असल्यास किंवा इतर कारणामुळे प्रवेश रद्द केल्यास, यामुळे रिक्त झालेली जागा त्याच दिवशी संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावी, मात्र त्याच दिवशी भरण्यात येऊ नये. अशी रिक्त जागा दुस-या दिवसापासून प्रवेशाकरिता उपलब्ध करून देण्यात यावी. (जागेवरील प्रवेश फेरीच्या शेवटच्या दिवशी रिक्त होणा-या जागांसंदर्भात ही बाब लागू नसेल.)

## परिशिष्ट 'एल'

## 'मरणोत्तर अवयवदान संमती अर्ज ' (ऐच्छिक)

मी नाव श्री./श्रीमती. .................................. ........... ............ ... ................ प्रवेश अर्ज क्र......................... स्वेच्छेने लिहून देतो की, माझ्या मरणोत्तर माझे अवयव दान करण्यासंबंधी मी संमती देत आहे.

ठिकाणः स्वाक्षरी ...................................

दिनांकः नाव- ....................................

अर्ज क्रमांक .....................................